

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : रविवार, २५ ऑक्टोबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३१५ | किंमत : २ रूपये

थोडक्यात

एकतर्फी प्रेम प्रकरणातून झाडली गोळी

नाशिक : गेल्या काही दिवसांत गुन्हेगारीच्या घटनांमध्ये गोळीबाराच्या घटना सातत्याने पुढे येत आहेत. मुंबईतील जुहू येथे अभिनेता टायगर श्रॉफवरील गोळीबार, बारामतीमधील गोळीबार, ठाण्यातील प्रदीप पूर्णेकर गोळीबार प्रकरणाने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. त्यातच, आता नाशिक शहरातील आडगाव परिसरात भरदिवसा गोळीबार झाल्याची घटना समोर आली असून पोलिसांनी याप्रकरणी दोन आरोपींना अटक केली आहे. एकतर्फी प्रेम प्रकरणातून हा गोळीबार झाल्याची माहिती पोलीस तपासातून समोर आली.

१८ ऑक्टोबर रोजी ही घटना घडली असून फिर्यादीची पत्नी आणि आरोपी एकाच ठिकाणी कामाला होते, त्याठिकाणी आरोपी संबधित महिलेला जबरदस्तीने प्रेमसंबंध ठेवण्यास सांगत होता. मात्र, महिलेनं नकार दिल्याच्या कारणावरुन आरोपीने फिर्यादीवर गोळीबार करुन त्यास जीवे मारण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी, नाशिक पोलिस गुन्हेशाखेच्या युनिट १ ने आरोपींना बेड्या ठोकल्या असून राहुल आंबेकर आणि विकास सोनवणे अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. प्रेम प्रकरणातून हा गोळीबार झाल्याची प्राथमिक माहिती पोलीस तपासातून समोर आली आहे. शहरातील रामवाडी रोडवरील कोशिरे मळा परिसरातून दोघांना अटक करण्यात आली, आरोपींकडून दोन मोबाईल आणि गुन्ह्यातील गावठी कट्टा पोलिसांनी जप्त केला आहे. विवाहित महिलेच्या एकतर्फी प्रेमातून राहुल आंबेकर याने हा गोळीबार केल्याची माहिती पोलिसांनी दिली. याप्रकरणी, आडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल दाखल करण्यात आला आहे. नाशिक पोलिसांच्या गुन्हेशाखा युनिट १ च्या पथकाला गुप्त माहितीद्वारे खबर मिळाली होती.

एफडीएच्या अधिकारावर गदा आणण्याचा प्रयत्न



वृत्तसंस्था, पुणे

एफडीएने केंद्रीय आरोग्य मंत्रालय आणि भारतीय अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण (एफएसएसएआय) विरोधात थेट मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. कायद्याची अंमलबजावणी करण्यापासून रोखले जात असल्याचा आणि अधिकार हिरावून घेतले जात असल्याचा एफडीएने दावा केला आहे. एफएसएसएआयने घटनाबा पद्धतीने समांतर अंमलबजावणी यंत्रणा निर्माण केली असून, त्याद्वारे राज्य सरकारच्या अधिकारांवर अतिक्रमण केल्याचा एफडीएचा दावा आहे. एफएसएसएआयच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी केंद्रीय अन्न सुरक्षा अधिकारी आणि केंद्रीय परवाना प्राधिकरण यांसारखी पदे निर्माण करून आपल्या अधिकारांचा बेकायदेशीरपणे वापर केल्याचे याचिकेत म्हटले असून ही पदे अन्न सुरक्षा आणि मानके कायद्याच्या वैधानिक चौकटीत बसत नसल्याचा एफडीएचा दावा आहे.

अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, २००६ चा उद्देश अन्न नियमनाचे विकेंद्रीकरण करणे हा होता, असा दावाही एफडीएकडून याचिकेत करण्यात आला आहे. यापूर्वी या कायद्याची अंमलबजावणी राज्याचे अन्न सुरक्षा आयुक्त आणि नियुक्त अधिकारी यांच्यामार्फत केली जात होती, असेही एफडीएने म्हटले आहे. मात्र, त्यानंतर केंद्र सरकार आणि एफएसएसएआय यांनी कायद्यात विविध सुधारणा केल्या. या सुधारणांमुळे विकेंद्रित अंमलबजावणी व्यवस्था हळूहळू मोडीत काढली जात असल्याचा दावा याचिकेत करण्यात आला.

२६ नोव्हेंबरला पार पडणार सुनावणी

घटनाबा सुधारणा आणि नियम रद्द करण्याची तसेच, केंद्रीय परवाना असलेल्या आस्थापनांची तपासणी करण्यापासून राज्याच्या अधिकाऱ्यांना रोखणाऱ्या मे २०२३ मधील आदेशाला स्थगिती देण्याची मागणी याचिकेत करण्यात आली आहे. २६ नोव्हेंबरला मुख्य न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठासमोर सुनावणी पार पडणार आहे.

डॅमेज कंट्रोलसाठी शिंदेंचा पुढाकार

आरोप-प्रत्यारोप थांबवा, कदमांनी मीडियाशी बोलू नये

वृत्तसंस्था, मुंबई

आता आरोप-प्रत्यारोप थांबवा आणि थेट दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीला जा, असे आदेश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना मंत्री, आमदार व कार्यकर्त्यांना दिले. राज्यातील दुष्काळाची परिस्थिती अत्यंत गंभीर असून अशा कठीण काळात शेतकऱ्याला आधार देणे हेच शिवसेनेचे प्रथम कर्तव्य आहे. दसऱ्याच्या मुहूर्तावर शिवसेनेकडून दुष्काळग्रस्त भागांसाठी साडेतीन लाख धान्याची किट पाठवण्यात आली आहेत. ही मदत घराघरापर्यंत पोहोचवा, असेही



ते म्हणाले.

मनोज जरांगे पाटील यांनी ५०० कोटींचा उल्लेख असलेली कथित ऑडिओ क्लिप जारी केली आणि राज्याच्या राजकारणात एकच खळबळ उडाली. शिवसेना नेते रामदास कदम यांनी तर या प्रकरणी थेट भाजप नेत्यांचीच नावे घेतली. त्यानंतर भाजपकडूनही शिवसेनेला जोरदार प्रत्युत्तर देण्यात आले. त्यामुळे महायुतीतील दोन पक्षांमध्येच रणधुमाळी सुरू झाली. या पार्श्वभूमीवर आता महायुतीत डॅमेज कंट्रोल सुरू झाला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आता पक्षातील मंत्री, नेते, लोकप्रतिनिधी यांना आता बजावले आहे.

पंचनामा प्रक्रियेत शेतकऱ्यांना मदत करा

शासकीय मदतीसाठी लागणारे अर्ज भरण्यापासून ते पंचनाम्यांच्या प्रक्रियेपर्यंत सर्व प्रशासकीय कामांत शिवसैनिकांनी शेतकऱ्यांना मदत करावी. बळीराजाची दिवाळी अंधारात जाऊ देणार नाही, हा जनतेला दिलेला शब्द असून तो पाळण्यासाठी सर्वांनी एकदिलाने काम करण्याचे आवाहन एकनाथ शिंदे यांनी केले आहे.

खासगी फायनान्स कंपनीची मुजोरी, कार्यालयात आढळला शेतकऱ्याचा मृतदेह

कर्जवसुलीसाठी त्यांना गावातून नांदेडला आणल्याचा आरोप नातेवाईकांनी केला

वृत्तसंस्था, नांदेड

कर्जाचा डोंगर, दुष्काळ आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची चिंता अशा परिस्थितीत एका अल्पभूधारक शेतकऱ्याचा शहरातील खाजगी फायनान्सच्या कार्यालयात गळफास घेतलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला. यामुळे खळबळ उडाली. शेतकऱ्याने खाजगी फायनान्सकडून केवळ १० हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. कर्जवसुलीसाठी त्यांना गावातून नदिडला आणल्याचा आरोप त्यांच्या नातेवाईकांनी केला असून, फायनान्स चालकानेच त्यांची हत्या केल्याचा संशयही व्यक्त केला. ही घटना नांदेड शहरातील हिंगोली गेट परिसरातील चिखलवाडी रोडवरील खालसा फायनान्सच्या कार्यालयात घडली. माळकौठा (ता. मुदखेड) येथील चंद्रकांत शिंदे हे अल्पभूधारक शेतकरी होते. त्यांच्या कुटुंबात आई, पत्नी आणि दोन मुली व दोन मुलगे आहेत. शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नावर कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबून होता. मात्र, दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक अडचणी वाढल्याने त्यांना खाजगी फायनान्सकडून कर्ज



घ्यावे लागले.

शिंदे यांनी मागील महिन्यात १० हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. मात्र, व्याजाच्या नावाखाली रक्कम कापून त्यांच्या हातात केवळ सात हजार रुपये देण्यात आल्याचा दावा करण्यात येत आहे. आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने त्यांना कर्जाची परतफेड करता आली नाही. याच कारणावरून त्यांच्यावर कर्जवसुलीसाठी दबाव आणण्यात आल्याचा आरोप नातेवाईकांनी केला.

कर्जाच्या वसुलीसाठी गुरुवारी फायनान्सशी संबंधित व्यक्तींनी चंद्रकांत शिंदे यांना माळकौठा येथून नदिडमधील कार्यालयात आणल्याचा आरोप त्यांच्या नातेवाईकांनी केला. त्यांच्याकडे ७० हजार रुपये भरण्याची मागणी करण्यात आल्याचेही नातेवाईकांचे म्हणणे आहे. शिंदे यांना कार्यालयात आणल्याची माहिती मिळाल्यानंतर कुटुंबीयांना ते एक-दोन दिवसांत परत येतील, अशी अपेक्षा होती. मात्र, त्यानंतर घडलेल्या घटनेने कुटुंबीयांना मोठा धक्का बसला. शुक्रवारी खालसा फायनान्सच्या कार्यालयात शिंदे यांचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. ही बातमी समजताच कुटुंबीय आणि नातेवाईक आक्रोश करत घटनास्थळी दाखल झाले.

फायनान्सच्या मालकाने माझ्या मुलाचा केला खून

आपल्या मुलाचा फायनान्सच्या मालकाने खून केला, असा आरोप मयत शिंदे यांच्या आईने केला तर मुलीने सांगितले की, आपल्या वडिलाने ७ हजाराचे कर्ज घेतले. मात्र एका महिन्यात ७० हजारांची मागणी करण्यात आली. यासाठी आपल्या वडिलांना जबर मारहाण करून खून केला, असा आरोप केला.

फायनान्स चालक पसार

चंद्रकांत शिंदे यांच्या मृत्यूमागे कर्जवसुलीसाठी आणलेला दबाव कारणीभूत असल्याचा आरोप नातेवाईकांनी केला. फायनान्स चालकाने त्यांची हत्या केल्याचा संशय व्यक्त करत या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली.

काश्मीरमध्ये ४ महिलांसह ६ जणांना अटक

वृत्तसंस्था, जम्मू : जम्मू आणि काश्मीरच्या बांदीपोरा जिल्ह्यात बंदी घातलेल्या 'इत्तेहाद-उल-मुस्लिमीन' या संघटनेशी संबंध असल्याच्या आरोपावरून सहा जणांना अटक करण्यात आली आहे. यामध्ये चार महिलांचा समावेश आहे. या नेटवर्कला सीमेपलीकडून निधी मिळत असल्याचा पोलिसांना संशय आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, बांदीपोरा आणि आसपासच्या परिसरात १४ ते १५ गुप्त बैठका झाल्या होत्या. यापैकी पाच ते सहा बैठका बांदीपोरा-बारामुल्ला रस्त्यावरील एका छोट्या हॉटेलमध्ये झाल्या होत्या. तपासकर्त्यांना एका वर्षापेक्षा जास्त कालावधीत अंदाजे ७ ते ८ लाख रुपयांचे संशयास्पद व्यवहार आढळून आले आहेत. बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) कायद्याच्या कलम १० आणि १३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निधीचा स्रोत आणि या नेटवर्कमध्ये सामील असलेल्यांच्या भूमिकेचा तपास करत आहेत.

पोलिसांच्या माहितीनुसार, कुपवारा जिल्ह्यातील हंदवारा येथील रहिवासी वाहिद अहमद भट यांच्यापासून तपासाला सुरुवात झाली. एका परिषदेनंतर त्याला २०२२ मध्ये यूएपीए प्रकरणात अटक करण्यात आली. पोलिसांच्या दाव्यानुसार, कुपवारा तुरुंगात असताना, भटने मंजूर अहमद शाह यांच्याशी पुन्हा संपर्क साधला, जो कथितरित्या पाकिस्तानात होता. त्यानंतर, या कथित नेटवर्कने आपल्या विचारधारेचा प्रसार करण्यासाठी आणि पाठिंबा मिळवण्यासाठी सभा आयोजित केल्या.

विहिंपने जाळला प्यारे खान यांचा पुतळा



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांना पदावरून हटविण्याच्या मागणीसाठी विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाने शनिवारी आंदोलन केले. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या निवासस्थानासमोर आंदोलन करण्याऐवजी महाल परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात निदर्शने करण्यात आली. यावेळी प्यारे खान यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करण्यात आले. नाशिक येथील कारागृहात राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी कुख्यात अबू सालेम याची भेट घेतल्याचे वृत्त समोर आल्यानंतर विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाने आक्रमक भूमिका घेतली आहे.

या कथित भेटीच्या पार्श्वभूमीवर प्यारे खान यांना पदावरून हटविण्याची मागणी करण्यात येत आहे. वासाठी शनिवारी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या महाल परिसरातील निवासस्थानासमोर आंदोलन करण्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र, शनिवारी सकाळी गडकरी यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर आंदोलनाचे ठिकाण बदलण्याचा निर्णय घेण्यात आला.

विश्व हिंदू परिषदेच्या नागपूर महानगरातील पदाधिकाऱ्यांनी शनिवारी नितीन गडकरी यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. यावेळी प्यारे खान यांच्याविषयीच्या तक्रारी आणि संघटनेची भूमिका गडकरी यांच्यासमोर मांडण्यात आल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. संबंधित विभागांकडे तक्रारी पाठवून त्यांची तपासणी करण्यात येईल, असे आश्वासन गडकरी यांनी दिल्याचा दावा विहिंपच्या पदाधिकाऱ्यांनी केला.

विश्व हिंदू परिषदेचे महानगर कार्यवाह अमोल ठाकरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, महाल परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आंदोलन करण्यात आले.

यावेळी प्यारे खान यांच्या विरोधात निदर्शने करून त्यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करण्यात आले. प्यारे खान यांना पदावरून हटविण्याची मागणीही संघटनेने केली. गेल्या दोन महिन्यांपासून या प्रकरणावरून आंदोलन सुरू असल्याचे ठाकरे यांनी नमूद केले.

न्यूझीलंडविरुद्ध थरारक विजय



वृत्तसंस्था, खाईस्टचर्च

भारतीय संघाने खाईस्टचर्च येथे झालेल्या न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यात अशक्य वाटणारा विजय शक्य करून दाखवला. शनिवारी खेळल्या गेलेल्या या सामन्यात भारताने न्यूझीलंडचा ४ विकेट्सने पराभव केला. एक वेळ अशी होती की, यजमान न्यूझीलंड संघ सहज जिंकेल, असे वाटत होते, कारण भारताला शेवटच्या ३ षटकांत ४६ धावांची गरज होती आणि ६ फलंदाज बाद झाले होते. मात्र, तिलक वर्मा आणि नितीश रेड्डी यांनी ७ व्या विकेटसाठी अवघ्या ३० चेंडूत नाबाद ६९ धावांची वादळी भागीदारी करत भारताला सामना जिंकवून दिला.

या विजयासह भारतीय संघाने मालिकेमध्ये २-० अशी भक्कम आघाडी घेतली. भारताची सुरुवात अत्यंत खराब झाली होती. संजू सॅमसन (१४), वैभव सूर्यवंशी (०४), कर्णधार श्रेयस अय्यर (०७) आणि अभिषेक शर्मा (२७) हे प्रमुख फलंदाज स्वस्तात बाद झाले. अवघ्या ७० धावांवर ५ विकेट्स गमावल्यामुळे भारताचा पराभव अटळ वाटत होता. परंतु तिलक आणि नितीश यांनी सामना पूर्णपणे फिरवला. तिलक वर्माने अवघ्या २६ चेंडूंत ६ चौकार आणि १ षटकाराच्या मदतीने नाबाद ५१ धावांची अर्धशतकी खेळी केली तर ७ व्या क्रमांकावर आलेल्या नितीश रेड्डीने १३ चेंडूंत १ चौकार आणि १ षटकारासह नाबाद २६ धावा कुटल्या. त्यामुळे अखेरच्या टप्प्यात भारताचा थरारक विजय झाला.

संपादकीय लेखणीतून...

५०० कोटींचा बॉम्ब

गत तीन वर्षापासून मराठा आरक्षण आंदोलन मोडून काढण्यासाठी तसेच आपल्याला गप्प करण्यासाठी, आंदोलन कमकुवत करण्यासाठी कट रचण्यात आल्याचा आरोप मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी गुरूवारी केला. शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून आपल्याला ५०० कोटी रुपये दिल्याचा दावा करणारांची कथित ऑडिओ क्लिप ऐकवत या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणीही जरांगे यांनी केली. जरांगेंच्या या ५०० कोटींच्या बॉम्बमुळे दिवाळीआधीच राज्याच्या राजकारणात धमाका झाल्याची चर्चा आहे. सत्ताधारी शिवसेनेच्या नेत्यांनी जरांगे यांच्या आरोपांना प्रत्युत्तर देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पक्षाची बदनामी करण्याचा हा कट असल्याचा दावा केला आहे. या ऑडिओ क्लिपमधील संभाषण करणारे लोक भाजपचे असल्याचा आरोप त्यांनी केला तसेच या क्लिपची फॉरेन्सिक तपासणी करण्याची मागणी केली. या कथित कटामागे कोण आहे, हे स्पष्ट करण्यासाठी पंतप्रधान मोदी, मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सखोल चौकशीचे आदेश द्यावेत, अशी मागणी जरांगे यांनी केली. कथित संभाषणातील एका व्यक्तीने खासदार श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून जरांगे यांना ५०० कोटी रुपये आधीच पोहोचवण्यात आल्याचा दावा केल्याचे ऐकू येते. संभाषणाच्या दुसऱ्या भागात विधानसभा निवडणुकीत जरांगे यांचा प्रभाव पक्षासाठी फायदेशीर ठरेल का? यावर चर्चा झाल्याचेही सांगितले जाते. मराठवाड्यात जरांगे यांचा वाढता प्रभाव रोखण्यासाठी कोणती रणनिती आखावी या वरही या संभाषणात चर्चा झाल्याचे कथित क्लिपमधून समोर आले आहे. मराठा आरक्षण, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि कर्जमाफी या मुद्यावर जरांगे सातत्याने भूमिका मांडत असल्याचा उल्लेखही संभाषणात असल्याचे सांगितले जाते. एका व्यक्ती जरांगे भाजपला मराठाविरोधी ठरवत असल्याचे ऐकू येते. दुसऱ्या व्यक्तीने जरांगे वेगवेगळे मुद्दे उपस्थित करत राहतील आणि त्यांच्या भूमिकेला विरोधकांना प्रत्युत्तर द्यावे लागेल, असे म्हटल्याचे ऐकू येते.

संभाषणात मराठी नेत्यांशी संपर्क साधणे आणि जरांगे यांच्या विरोधात असलेल्या समाजातील लोकांना एकत्र आणण्याबाबतही चर्चा झाल्याचे सांगितले जाते. जरांगे यांचा प्रभाव रोखला नाही तर मराठवाड्यात ते पक्षावर राजकीयदृष्ट्या वरचढ ठरू शकतील अशीही चर्चा आहे म्हणे. पक्षातील आमदार जरांगे यांच्या विरोधात बोलण्यास तयार नसल्याचा उल्लेख संभाषणात असल्याचे सांगितले जाते. याशिवाय राजकीय ध्रुवीकरणाला फायदा होऊ शकणाऱ्या लव्ह जिहाद आणि व्होट जिहाद यासारख्या मुद्यांवर पक्षाकडून भूमिका मांडली जात नसल्याबाबतही चर्चा झाल्याचा दावा आहे. बुधवारी शिंदे यांनी ५०० कोटी रुपये कोणीही दिलेले किंवा घेतलेले नाहीत, असे स्पष्ट केले. जरांगे यांनी आपला आरोप सिद्ध करून दाखवावा, असे आव्हानही त्यांनी दिले. जरांगे-पाटील यांनी जाहीर केलेल्या कथित ५०० कोटी रुपयांच्या ऑडिओ क्लिपबाबत आणि त्यांना अडकावण्याच्या षड्यंत्राबाबत जर त्यांच्याकडे ठोस पुरावे असतील तर त्यांनी केवळ माध्यमात बोलण्यापेक्षा पोलिस ठाणे किंवा जिल्हाधिकाऱ्यांकडे अधिकृत तक्रार नोंदवावी. सरकारकडे रितसर तक्रार आल्यानंतर मुख्यमंत्री आणि गृह खाते संबंधित यंत्रणांमार्फत त्याची निष्पक्ष व सखोल चौकशी करेल. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या पूर्वीच स्पष्ट केले आहे की, त्यांनी कोणालाही पैसे दिलेले नाहीत आणि घेतलेले नाहीत, अशी रोखठोक भूमिका महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मांडली आहे.

मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी ऐकविलेल्या कथित ऑडिओ क्लिप प्रकरणाची सायबर सेल आणि फॉरेन्सिक लॅबमार्फत तात्काळ तपासणी करण्यात यावी. क्लिपची सत्यता, आवाजाची ओळख आणि संभाषणात काही फेरफार करण्यात आला आहे का, याची संबंधित व्यक्तीच्या आवाजाचे नमुने घेऊन शास्त्रीय पद्धतीने पडताळणी करण्यात यावी, अशी मागणी शिवसेना शिंदे गटाच्या शिष्टमंडळाने गुरूवारी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन केली. मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल, असे म्हटले आहे. पंतप्रधान मोदी, मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी या क्लिपचा छडा लावावा. फडणवीस आणि शिंदे यांनी आपल्याविरुद्धचे षड्यंत्र थांबवले नाही तर १-२ महिन्यात असा बॉम्ब टाकेन की, २०२९ च्या निवडणुकीत राज्यात एकालाही पाय ठेवायला जागा उरणार नाही, असा इशारा जरांगे-पाटील यांनी दिला आहे.

मध्यपूर्वेतील महासंग्राम : सौदी-हुती संघर्ष आणि बदलणारे भूराजकीय समीकरण

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

मध्यपूर्वेतील भूराजकीय समीकरणे झपाट्याने बदलत असून, सौदी अरेबिया आणि येमेनमधील हुती बंडखोर यांच्यातील संघर्ष पुन्हा एकदा तीव्र झाला आहे? २०२२ च्या संयुक्त राष्ट्रांच्या मध्यस्थीने झालेल्या युद्धबंदीनंतर निर्माण झालेली तात्पुरती शांतता आता पूर्णपणे संपुष्टात आली असून, या संघर्षाने एका मोठ्या प्रादेशिक महासंग्रामाचे रूप धारण केले आहे.

मध्यपूर्वेतील वाळवंट पुन्हा एकदा एका नव्या आणि अत्यंत विनाशकारी युद्धाच्या ठिणगीने धगधगू लागले आहे. वर्चस्वाची लढाई, धार्मिक तेढ आणि जागतिक महासत्तांचे छुपे हितसंबंध यामुळे हा संपूर्ण प्रदेश एका मोठ्या भूराजकीय महासंग्रामाच्या उंबरठ्यावर उभा आहे. या संघर्षाच्या केंद्रस्थानी सध्या सौदी अरेबिया आणि त्यांच्यावर सातत्याने जीवघेणे हल्ले करणारा येमेनमधील 'हुती' बंडखोरांचा गट आहे. विसाव्या शतकाच्या अखेरीस, म्हणजेच एकोणीसशे नव्वदच्या दशकात येमेनच्या तत्कालीन सरकारच्या भ्रष्टाचाराला आणि सौदी अरेबियाच्या वाढत्या प्रभावाला विरोध करण्यासाठी ही चळवळ उभी राहिली. शिया मुस्लिमांच्या 'झैदी' पंथाचा हा एक राजकीय आणि सशस्त्र लष्करी गट असून, ते स्वतःला 'अन्सार अल्लाह' म्हणजेच देवाचे समर्थक असे मानतात. आज या गटाने केवळ येमेनपुरते मर्यादित न राहता एका शक्तिशाली प्रादेशिक धोक्याचे रूप धारण केले आहे. इराणकडून मिळणारा भक्कम आर्थिक पाठिंबा आणि अत्याधुनिक लष्करी रसद, ज्यामध्ये प्रगत ड्रोन आणि बॅलेस्टिक क्षेपणास्त्रांचा समावेश आहे, याच्या बळावर हुती बंडखोरांनी सौदी अरेबियाच्या नागरी आणि औद्योगिक क्षेत्रांना वेठीस धरले आहे. सौदी अरेबिया आणि इराण यांच्यात मध्यपूर्वेत वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी जे छुपे युद्ध सुरू आहे, त्याचाच हा एक अत्यंत घातक आणि रक्तरंजित अध्याय बनला आहे.

हुती बंडखोरांनी आता आपली रणनीती बदलली असून, सौदी अरेबियाची अर्थव्यवस्था पूर्णपणे उद्ध्वस्त करण्याच्या उद्देशाने त्यांनी जाणीवपूर्वक तेल शुद्धीकरण प्रकल्प आणि आंतरराष्ट्रीय विमानतळांना लक्ष्य करण्यास सुरुवात केली आहे. याच मालिकेतील सर्वात मोठा आणि विनाशकारी हल्ला नुकताच २१ ऑक्टोबर रोजी रात्री दम्माम येथील किंग फहद आंतरराष्ट्रीय विमानतळावर करण्यात आला. या भयंकर हल्ल्याने संपूर्ण सौदी अरेबिया हादरून गेला. या हल्ल्यात एका भारतीय नागरिकाचा दुर्दैवी मृत्यू झाला असून दोन भारतीय नागरिक गंभीर जखमी झाले आहेत. सौदीच्या नागरी विमान वाहतूक प्राधिकरणाच्या अहवालानुसार या विमानतळ हल्ल्यात एकूण १० जण जखमी झाले आहेत. या अनपेक्षित संकटामुळे विमानतळाचे अतोनात नुकसान झाले आणि सुरक्षिततेचा उपाय म्हणून अनेक विमानांचे मार्ग तातडीने बदलण्यात आले. याच भीषण रात्री सौदी अरेबियाच्या पूर्वेकडील अत्यंत महत्त्वाच्या तेल क्षेत्रांवरही ड्रोनद्वारे हल्ला करण्याचा मोठा कट रचण्यात आला होता. सौदीच्या सुरक्षायंत्रणांनी हे ड्रोन हवेतच नष्ट केले असले, तरी त्याचे जळते आणि स्फोटक अवशेष जमिनीवर कोसळल्याने नेपाळ आणि फिलिपिन्सच्या दोन परदेशी कामगारांचा नाहक बळी गेला, तर भारत आणि पाकिस्तानचे काही नागरिक यात जखमी झाले.

ऑक्टोबर महिना सौदी अरेबियाच्या इतिहासातील अत्यंत रक्तरंजित महिना ठरला असून, एकाच महिन्यात तब्बल ५ मोठे हल्ले झाले आहेत. या महिन्याच्या सुरुवातीलाच, ६ ऑक्टोबर रोजी जिझान आणि नजरान येथील विमानतळांवर अनपेक्षित हल्ले झाले. या धक्क्यातून सावरण्यापूर्वीच ७ आणि ८ ऑक्टोबर रोजी रियाध आणि अभा येथील विमानतळांना लक्ष्य करण्यात आले, ज्यामध्ये एका प्रवासी विमानाचे मोठे नुकसान झाले. परंतु, परिस्थितीची सर्वाधिक भीषणता १० ऑक्टोबर रोजी जगासमोर आली. रियाधच्या किंग खालिद आंतरराष्ट्रीय विमानतळावर आतापर्यंतचा सर्वात मोठा आणि क्रूर हल्ला झाला. या भयंकर हल्ल्यात तब्बल १३ निष्पाप नागरिकांचा बळी गेला आणि ३०० हून अधिक जण गंभीर जखमी झाले. या घटनेची धग ओसरत नाही तोच, दुसऱ्याच दिवशी म्हणजेच ११ ऑक्टोबर रोजी याच विमानतळावर पुन्हा एकदा हल्ला करण्यात आला, ज्यात एका पाकिस्तानी नागरिकाचा मृत्यू आणि ११ जण जखमी झाले. एकापाठोपाठ एक होणाऱ्या या हल्ल्यांमुळे सौदी अरेबियाची सुरक्षा व्यवस्था पूर्णपणे उघडी पडली असून, जागतिक पातळीवर मोठी खळबळ उडाली आहे.

या सततच्या आणि वाढत्या हल्ल्यांमागे केवळ धार्मिक किंवा प्रादेशिक द्वेष नसून, एक अतिशय गुंतागुंतीचे राजकीय आणि लष्करी कारण दडलेले आहे. इसवी सन २०१४ मध्ये हुती बंडखोरांनी येमेनची राजधानी साना ताब्यात घेऊन तेथील आंतरराष्ट्रीय मान्यता प्राप्त सरकारला सत्तेवरून बेदखल केले. त्यानंतर २०१५ मध्ये सौदी अरेबियाने आपल्या मित्र राष्ट्रांची आघाडी उघडून येमेनमध्ये थेट लष्करी हस्तक्षेप केला आणि हुतींवर भीषण हवाई हल्ले सुरू केले. याशिवाय सौदी आघाडीने येमेनवर कडक सागरी आणि हवाई नाकेबंदी लादली. या नाकेबंदीमुळे येमेनमध्ये अन्न, पाणी आणि औषधांचा तीव्र तुटवडा निर्माण होऊन जगातील सर्वात मोठे आणि भयंकर मानवतावादी संकट उभे राहिले आहे. हजारो निष्पाप नागरिकांचे बळी गेले आहेत. याच नाकेबंदीला विरोध करण्यासाठी आणि सौदीला वाटाघाटींच्या टेबलावर आणून त्यांची कोंडी करण्यासाठी हुतींकडून जाणीवपूर्वक सौदीच्या पायाभूत सुविधांवर हल्ले केले जात आहेत. या वाढत्या धोक्याच्या आणि अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर, अमेरिकेने आपल्या सरकारी अधिकाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना सुरक्षेच्या कारणास्तव सौदी अरेबिया तातडीने सोडण्याचे निर्देश दिले आहेत.

पश्चिम आशियाची सध्याची स्थिती ही एका जिवंत ज्वालामुखीसारखी झाली असून, कोणत्याही क्षणी या संपूर्ण प्रदेशाचा भडका उडण्याची शक्यता नाकारता येत नाही. एका बाजूला हुती बंडखोरांनी सौदी अरेबिया आणि लाल समुद्रातील व्यापारी मार्गांवर चालवलेले हल्ले प्रादेशिक अर्थव्यवस्थेचा गळा घोटत आहेत, तर दुसऱ्या बाजूला या बंडखोरांचा मुख्य सूत्रधार असलेल्या इराणवर थेट लष्करी कारवाई करण्यासाठी जागतिक महासत्तांमध्ये अत्यंत गंभीर खलबते सुरू आहेत.

इराणच्या अण्वस्त्र कार्यक्रमाची भीती आणि त्यांच्या छुप्या सशस्त्र गटांचा वाढता उपद्रव पाहता, जर आंतरराष्ट्रीय समुदायाने इराणच्या लष्करी किंवा तेल तळांवर थेट हल्ला केला, तर हे युद्ध केवळ दोन देशांपुरते मर्यादित राहणार नाही; त्यात लेबनॉनमधील हिजबुल्लाह, सीरिया आणि इराकमधील सशस्त्र गटही थेट उडी घेतील. जगातील सर्वाधिक खनिज तेलाचा पुरवठा करणाऱ्या या आखाती प्रदेशात जर असा सर्वंकष संघर्ष पेटला, तर केवळ पश्चिम आशियाच नव्हे, तर संपूर्ण जगाला महागाई, इंधनटंचाई आणि अभूतपूर्व आर्थिक मंदीच्या खाईत लोटले जाईल. मुत्सद्देगिरीचे सर्व मार्ग आता वेगाने बंद होत असून, हा संपूर्ण भूभाग एका विनाशकारी महायुद्धाच्या बारुदाच्या ढिगाऱ्यावर उभा आहे, जिथे एक छोटीशी ठिणगीही संपूर्ण जगाची अर्थव्यवस्था आणि शांतता होरपळून काढू शकते.

हुतींनी लाल समुद्र आणि बाब अल-मांदेब जलसामुद्रधुनी मधून होणाऱ्या आंतरराष्ट्रीय व्यापारी जहाजांची वाहतूक रोखली आहे. यामुळे जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाली असून मालवाहतुकीचा खर्च आणि कच्च्या तेलाच्या किमती गगनाला भिडू लागल्या आहेत. आधुनिक युद्धात एखादा गट आकाराने लहान असूनही महासत्तांना किती मोठा आर्थिक फटका देऊ शकतो, याचे हे स्पष्ट उदाहरण बनले आहे.

संघर्षाची व्याप्ती पाहता, यावर केवळ लष्करी कारवाई हा अंतिम उपाय ठरू शकत नाही. मध्यपूर्वेमध्ये दीर्घकालीन शांततेसाठी हुती, सौदी आणि इराण यांच्यात एक शाश्वत राजकीय तडजोड होणे गरजेचे आहे, अन्यथा हा महासंग्राम जागतिक युद्धाचे केंद्र बनण्याची भीती नाकारता येत नाही.

- ९५६१५९४३०६

भारत - झिंबाब्वे महिला वनडे मालिका

भारतीय महिलांची पहिल्या सामन्यात धमाकेदार कामगिरी, प्रतिका रावलचे नाबाद शतक

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

भारतीय महिला संघाने पहिल्या एकदिवसीय सामन्यात झिम्बाब्वेला ९ गडी राखून हरवून तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. प्रथम फलंदाजी करताना झिम्बाब्वेने ४९.५ षटकांत १९७ धावा केल्या. प्रत्युत्तरात भारताने २७.१ षटकांत एक गडी गमावून २०० धावा केल्या. भारताने १३७ चेंडू शिल्लक असताना लक्ष्य गाठले. शुक्रवारी वडोदरा येथे, प्रतिका रावलने नाबाद १०० धावा केल्या. शेफाली वर्माने ३३ चेंडूंमध्ये नाबाद ६४ धावा केल्या. या दोघींनी ७० चेंडूंमध्ये दुसऱ्या विकेटसाठी १०६ धावा जोडल्या.

श्री चरणीने ४ बळी

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतलेल्या झिम्बाब्वेची सुरुवात चांगली झाली नाही. क्रांती गौडने लॉरेन फिरीला १ धावेवर बाद करून भारताला पहिले यश मिळवून दिले. त्यानंतर चिपो मुगेरी-तिरिपानो आणि मॉडेस्टर मुपाचिकवा यांनी दुसऱ्या विकेटसाठी ४३ धावा जोडून डाव सावरण्याचा प्रयत्न केला. श्री चरणीने मुगेरी-तिरिपानोला २१ धावांवर बाद करून ही भागीदारी तोडली. त्यानंतर त्याने मुपाचिकवाला २५ धावांवर झेलबाद केले. चरणीने आपली बळी घेण्याची मालिका सुरू ठेवत न्याशा ग्वांझुराला १३ धावांवर आणि मिशेल मावुंगाला २९ धावांवर बाद केले. अशाप्रकारे, तिने १० षटकांत २३ धावांत ४ बळी घेतले, ज्यात ३ निर्धाव षटकांचा समावेश होता. निर्धाव षटक म्हणजे असे षटक ज्यात फलंदाज एकही धाव करू शकत नाही.

क्रांती गौडने ३ बळी घेतले, तर दीप्ती शर्माने २ आणि शेफाली वर्माने १ बळी घेतला. झिम्बाब्वेसाठी बिलावद बीजाने सर्वाधिक ६२ धावा केल्या. तिने ९२ चेंडूंमध्ये ५ चौकार मारले. तथापि, सतत विकेट पडत राहिल्याने संघ १९७ धावांवर सर्वबाद झाला. क्रांती गौडने स्वतःच्या गोलंदाजीवर झेल पकडून लॉरेन फिरीला १ धावेवर बाद केले.

प्रतिकाने दिली दिशा

१९८ धावांचा पाठलाग करताना भारताने वेगवान सुरुवात केली. एका टोकाकडून प्रतिका रावलने सूत्रे हाती घेतली आणि कर्णधार स्मृती मंधानासोबत पहिल्या विकेटसाठी ९४ धावांची भागीदारी केली. स्मृती १६ व्या षटकात ३४ चेंडूंमध्ये ३२ धावा करून बाद झाली. ओलिएंडर चारेच्या गोलंदाजीवर बिलावद बीजाने तिचा झेल घेतला. स्मृती बाद झाल्यानंतर, प्रतिकाने आपल्या धावगतीला धीमा होऊ दिले नाही. तिने १५ चौकारांसह ९६ चेंडूंमध्ये नाबाद १०० धावा पूर्ण केल्या.

प्रतिकाचे तिचे तिसरे एकदिवसीय शतक

शेफलीने २९ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले. दुसऱ्या टोकाकडून शेफाली वर्माने आक्रमक फलंदाजी केली. तिने अवघ्या २९ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले आणि ३३ चेंडूंमध्ये नाबाद ६४ धावा केल्या. तिच्या खेळीत ५ चौकार आणि ४ षटकारांचा समावेश होता. शेफालीने झिम्बाब्वेच्या गोलंदाजांवर दबाव कायम ठेवला, ज्यामुळे भारताला २३ षटकांपूर्वीच विजय मिळवता आला. शेफालीने षटकार मारून आपले अर्धशतक पूर्ण केले. बीजाने एक बाजू सांभाळली, तर मावुंगाने जलद गतीने धावा केल्या.

बीजा ही झिम्बाब्वेची सर्वात यशस्वी फलंदाज ठरली. तिने ६२ धावा केल्या. तथापि, दुसऱ्या बाजूला सतत विकेट पडत राहिल्यामुळे संघाला मोठी धावसंख्या गाठता आली नाही. दीप्ती शर्माच्या गोलंदाजीवर सायली सतघरेने शर्ना मेयर्स ८ धावांवर झेलबाद झाली. न्याशा ग्वांझुरा १३ धावांवर बाद झाली.

खालच्या फळीत, मिशेल मावुंगाने २३ चेंडूंमध्ये २९ धावांची जलद खेळी केली. तिच्या या खेळीत ३ चौकार आणि १ षटकाराचा समावेश होता. दीप्ती शर्माने टेंडाई माकुशाला १० धावांवर बाद करून झिम्बाब्वेचा डाव संपवला. दीप्तीने ९.५ षटकांत ४४ धावा देऊन २ बळी घेतले, तर शेफाली वर्माने सिबांडाला बाद केले.

- ९०९६३७२०८२

जगाची वाटचाल तिसऱ्या महायुध्दाकडे, तरीही "संयुक्त राष्ट्रसंघ"बघ्याच्या भूमिकेत?

रमेश लांजेवार
नागपूर

जगातील काही भागात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे व याचा गंभीर परिणाम जगातील तळागाळातील देशांवर होत आहे.याबाबी संयुक्त राष्ट्र उघड्या डोळ्यांनी पहात आहे. परंतु यावर तोडगा किंवा कोणतीही कठोर निर्णय घेतांना दिसत नाही ही जगासाठी अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. २०२० मधील अजरबैझान-आर्मेनिया युद्ध ,२०२१ चे अफगाणिस्तान-तालिबान युद्ध,२०२२ पासुन आतापर्यंत सुरू असलेले रशिया-युक्रेन युद्ध आणि आता नुकताच सुरू झालेले हमास-हिज्बुल्ला-इराण-इस्त्रायल-अमेरिकेचा भयावह संघर्ष यामुळे जगात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसून येते. अशा भयावह स्थितीमध्ये परमाणू युध्दाची शक्यता नाकारता येत नाही. कारण हे युद्ध आता हमास-हिज्बुला -इराण-अमेरिका-इस्त्रायल युद्ध किंवा रशिया-युक्रेन युद्ध सीमित रहाले नसुन महायुद्धाची नांदी आहे.अशा परिस्थितीत तिसऱ्या महायुध्दाची ठीनगी केव्हाही उडु शकते व आगीचा गोळा बनु शकते याला नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे चीन-तैवान संघर्ष सुरूच आहे आणि आता अफगाणिस्तान व पाकिस्तान यांचाही संघर्ष टोकाला पोहोचला आहे.अशा भयावह स्थितीत तिसऱ्या महायुद्धाची पुणरावृत्ती होणार नाही याची दक्षता "संयुक्त राष्ट्रसंघाने"घेतली पाहिजे. परंतु सध्याच्या परिस्थितीत संयुक्त राष्ट्र संघाची भूमिका संथगतीने दिसत आहे.

यामुळे जगात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. सध्याच्या परिस्थितीत गेल्या चार वर्षांपासून रशिया -युक्रेन युद्ध किंवा आता सुरू असलेला हमास-हिज्बुल्ला- इराण-इस्त्रायल-अमेरिका संघर्ष किंवा अफगाणिस्तान- पाकिस्तान संघर्ष जगाला केव्हाही हादरा देवू शकतो.

सध्या निर्माण झालेली जगातील "विध्वंसकारी" परीस्थिती पहाता "संयुक्त राष्ट्रसंघाने" मानव कल्याणासाठी कठोर पाऊल उचलण्याची गरज आहे.परंतु संयुक्त राष्ट्रसंघाचे काम अत्यंत संथगतीने सुरू आहे.आज संयुक्त राष्ट्रसंघ ८१ वर्षांचा झाला असला तरीही जगात संघर्ष कमी न होता मोठ्या प्रमाणात वाढत आहे ही अत्यंत चिंताजनक व गंभीर बाब आहे. संयुक्त राष्ट्रसंघटना अनेक देशांतील घडामोडीवर नियंत्रण ठेवण्याचे काम करीत असते.पहिल्या महायुद्धानंतर १९२९ मध्ये "राष्ट्र संघाची" स्थापना करण्यात आली.परंतु "राष्ट्रसंघ" प्रभावहीन असल्यामुळे "संयुक्त राष्ट्रसंघटनेची"२४ आक्टोंबर १९४५ ला स्थापना करण्यात आली.यावेळी संयुक्त राष्ट्र अधिपत्रावर ५० देशांच्या सह्यानीशी याची स्थापना करण्यात आली.परंतु आता जगातील अनेक देश संयुक्त राष्ट्र संघटनेचे सदस्य आहेत. यामुळे प्रत्येक देशाला आप-आपल्या तक्रारी मांडन्याचा अधिकार संयुक्त राष्ट्रसंघटनेने दिलेला आहे.

युध्दजन्य परीस्थिती, भुकमरी, कुपोषण, मानवधिकार, अंतराष्ट्रीय सुरक्षा, आर्थिक विकास, सामाजिक प्रगती आणि विश्व शांति इत्यादी संपूर्ण बाबींनवर चर्चा संयुक्त राष्ट्र संघटनेच्या माध्यमातून केली जाते. दुसऱ्या महायुद्धानंतर विजयी झालेल्या देशांनी एकत्र येऊन संयुक्त राष्ट्राला आंतरराष्ट्रीय संघर्षामध्ये हस्तक्षेप करण्याच्या उद्देशाने संघटनेची स्थापना करण्यात आली. संघटनेचा उद्देश हा आहे की भविष्यात द्वितीय महायुध्दासारखी महाभयानक परीस्थिती उदभवु नये या उद्देशाने याची स्थापना करण्यात आलेली आहे.संयुक्त राष्ट्र संघटनेची संरचना शक्तीशाली देश अमेरिका, फ्रांस, ब्रिटन, रूस आणि संयुक्त राजशाही यांनी द्वितीय विश्व युध्दात अत्यंत महत्वाची भूमिका बजावली होती.सध्याच्या परिस्थितीत संयुक्त राष्ट्रसंघटनेमध्ये १९३ पेक्षा जास्त देश आहेत.

जगातील सर्वच आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त देश या संस्थेशी जुडुन आहेत. या संस्थेची संरचना, आम सभा, सुरक्षा परिषद, आर्थिक व सामाजिक परिषद, सचिवालय आणि आंतरराष्ट्रीय न्यायालय या संपूर्ण बाबीं या संस्थेमध्ये आहेत.संयुक्त राष्ट्र संघटना ही एक चांगली आंतरराष्ट्रीय उपयोगी संघटना आहे. गेल्या २० वर्षापासुन अफगाणिस्तानमध्ये अमेरिका व नाटोची सेना होती.यामुळे अफगाणिस्तानचे नागरिक स्वतःला सुरक्षित समजत होते.परंतु अमेरिकेने २०२१ मध्ये आपले सैन्य माघारी बोलावल्यामुळे अवघ्या १०० दिवसात खुनी तांडव निर्माण होवून लाखो निरअपराध्यांचा बळी तालिबानी आतंकवाद्यांनी घेतला व अफगाणिस्तानवर संपूर्ण कब्जा मिळविला आणि अफगाणिस्तानला रक्ताच्या लाथोळ्यात लोटले.परंतु यात संयुक्त राष्ट्र संघाने थोडासाही हस्तक्षेप केला नाही ही संयुक्त राष्ट्रसंघाची शोकांतिकाच म्हणावी लागेल.

संयुक्तराष्ट्र संघटनेच्या माध्यमातून पाकिस्तान नेहमी भारताच्या विरूद्ध चिखल फेक करीत असतांना दीसुन येते. सिरियामधील अत्याचाराच्या घटना संयुक्त राष्ट्रसंघापुढे मांडुन या घटना जम्मु काश्मिरमध्ये घडत असल्याचे सांगून भारत मानवाधिकाराचे उल्लंघन करीत असल्याचा "पोपोगंडा" पाकिस्तान नेहमीच करीत असतो. कारण भारतीय घटनेतील ३७० व ३५ ए कलम हटविल्याचे दुःख पाकिस्तानला जास्तच होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे हा मुद्दासुध्दा पाकिस्तानने संयुक्त राष्ट्रांमध्ये अनेकदा नेलेला आहे. परंतु संयुक्त राष्ट्राने पाकिस्तानचे संपूर्ण आरोप फेटाळून लावले.

आज संयुक्त राष्ट्र संघ नसता तर जगामध्ये अनेक देशात आपसा-आपसात गृहयुद्ध पहायला मिळाली असती. कारण आज जगातील संपूर्ण राष्ट्रे "बारूदच्या ढिगाऱ्यावर"बसली आहेत व एकमेकांना धमकी देताना दिसतात.परंतु संयुक्त राष्ट्र संघटनेच्या माध्यमातून अनेक राष्ट्रांमध्ये होत असलेला संघर्ष व कटुता दुर करण्याचे काम आज संयुक्त राष्ट्र संघटना करीत आहे. आज उत्तर कोरिया आणि दक्षिण कोरिया यांच्यात नेहमी तनातनीचे वावरत दिसायचे परंतु संयुक्त राष्ट्र संघटनेच्या माध्यमातून यावर तोडगा काढण्यात आला व युध्दजन्य परीस्थिती हाताळण्याचे काम संयुक्त राष्ट्रसंघटनेने केले. उत्तर कोरियाचा "तानाशहा किंम जोंग उन" हा नेहमी अमेरिकेला युध्दाची धमकी देत असतो आणि आताही देतो. परंतु संयुक्त राष्ट्रसंघटना याला हाताळण्याचे काम करीत असते. २०२० मध्ये अजरबैझान -आर्मेनिया यांच्यातील संघर्ष टोकाला गेला होता. यांच्या संघर्षामुळे तिसऱ्या महायुद्धाचे बादल जगावर दिसत होते.

- ९९२१६९०७७९

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

भारतीय शिक्षण व्यवस्थेचा प्राचीन वारसा जपणे गरजेचे : मुख्यमंत्री फडणवीस

आंतरराष्ट्रीय प्राचार्य शैक्षणिक परिषदेचा नागपुरात समारोप



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

भारतातील प्राचीन शिक्षण व्यवस्था अतिशय महान असून येथे तक्षशिला, नालंदा, विक्रमशिलासारखी विद्यापीठे अस्तित्वात होती. जगाच्या कानकोपऱ्यातून विद्यार्थी येथे ज्ञानार्जनासाठी येत. हे प्राचीन ज्ञान एवढे वैशिष्ट्यपूर्ण होते की तेव्हाही भारत जागतिक व्यापार, जीडीपी व निर्यातीतही वर्चस्व गाजवत होता. वर्तमानात दिशादर्शक ठरणाऱ्या प्राचीन भारतीय शिक्षण व्यवस्थेचा वारसा जपणे ही येणाऱ्या पिढीची मोठी जबाबदारी व काळाचीही गरज असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ९ व्या आंतरराष्ट्रीय प्राचार्य शैक्षणिक परिषदेच्या समारोपीय समारंभात ते बोलत होते. मिहान येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (आयआयएम) येथे आयोजित या कार्यक्रमास शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर, माजी खासदार डॉ. नितीश भारद्वाज यांची विशेष उपस्थिती होती. आयआयएम नागपूरचे संचालक डॉ.भीमराया मेत्री, द साऊथ पब्लिक स्कूलच्या प्राचार्य डॉ. मृणालिनी दस्तुरे, सनफ्लॉवर व तायची पब्लिशिंगचे व्यवस्थापकीय संचालक राजेश घई, नवनीत प्रकाशन संस्थेचे अध्यक्ष (एज्युकेशनल बुक्स डिव्हिजन) देविश गाला, द साऊथ पब्लिक स्कूलचे संचालक दिवेन दस्तुरे, न्यू सरस्वती हाऊसचे नॅशनल सेल्स हेडचे प्रमुख विरल उपाध्याय, एड्युव्हेटचे प्रमुख नुपूर मराठे आणि ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसचे सहयोगी संचालक रविशंकर रथ आदी यावेळी उपस्थित होते.

प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीची महानता सांगताना श्री. फडणवीस यांनी आचार्य चाणक्य, पाणिनी या विद्वानांचे व त्यांच्या ग्रंथाचे दाखले दिले. ते म्हणाले, पूर्वी शिक्षणाची प्रणाली 'शास्त्र' व 'संवाद' रुपात होती. ज्ञान केवळ सैद्धांतिक नव्हते तर उपयोजित व कौशल्य-आधारित होते. त्यातूनच राष्ट्रीय, सामाजिक व वैयक्तिक विकास साधता येतो. 'एआय'च्या युगात मानवी मूल्ये, नीतिमत्ता व चारित्र्य जपण्याची मोठी जबाबदारी नव्या पिढीवर असून आपल्या शिक्षण प्रणालीचा केंद्रबिंदू असलेल्या विद्यार्थ्याभोवतीच्या अनेक चर्चा आपण ऐकतो. या परिषदेने 'जनरेशन वॉव' (वर्ल्ड ऑफ आकार देण्याची असली पाहिजे. माहितीचे ज्ञानात रूपांतर करण्यासाठी आवश्यक ती सखोल चर्चा व मंथन या परिषदेच्या माध्यमातून करण्यात येत असल्यामुळे ही परिषद महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

फडणवीस म्हणाले, अनेक आक्रमणांमुळे आपल्या देशातील विद्यापीठे व व्यवस्था कोलमडली. विल्यम ॲडम यांच्या सर्वेक्षणानुसार बंगाल, बिहार, पंजाब राज्यांमध्ये लक्षावधी शाळा होत्या. मद्रास प्रेसिडेन्सीमध्ये हजारो व्याकरणशाळा होत्या. आपल्यावर राज्य करणाऱ्यांच्या या नोंदी आहेत. यावरून प्राचीन भारतातील शैक्षणिक समृद्धता लक्षात येते. परंतु ही शैक्षणिक पद्धती व प्रणाली दीर्घकाळ टिकू शकली नसली तरी येथील समाज सुधारकांनी घडवून आणलेल्या क्रांतीने येथे शिक्षणाची बीजे पुनःश्च रोवल्या गेली. त्यातून आपण विकास साधत आहोत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाअंतर्गत या क्षेत्रात अनेक नवीन पद्धतींचा अवलंब करण्यात येत आहे. आपण आपले लक्ष आता नव्या पिढीवर केंद्रित करीले पाहिजे. तंत्रज्ञानाचा वापर करणे आपल्याच हातात असून आपण या नव्या पिढीची नवी जडणघडण करायला हवी. मातृभाषेची कास आपण सोडता कामा नये कारण विकसित देशांची शिक्षण प्रणाली त्यांच्या मातृभाषेत आहे. नवीन शैक्षणिक धोरणात याचा अंतर्भाव करण्यात आला आहे. तंत्रज्ञानाच्या आहारी जाण्यापेक्षा ते वापरण्याचे कौशल्य आपण आत्मसात केले तर सर्वांगीण विकास साधता येणे शक्य आहे, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

पंकज भोयर म्हणाले, 'वर्ल्ड ऑफ वंडरफुल जनरेशन' या संकल्पनेवर आंतरराष्ट्रीय शिक्षण परिषदेत शिक्षण क्षेत्रातील आव्हानांवर सखोल चर्चा पार पडल्या. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश २०४७ च्या विकसित भारत या लक्ष्याकडे वाटचाल करत असून, महाराष्ट्रात 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा, आणि 'मुख्यमंत्री विज्ञान विद्यार्थी वारी' यांसारखे उपक्रम राबवले जात आहे. या शिक्षण केंद्री उपक्रमातून विद्यार्थ्यांचा विकास होत आहे. शिक्षण केवळ ज्ञान मिळवण्यासाठी नसून समाज परिवर्तनासाठी आहे. मुख्याध्यापक आणि शिक्षक हे विद्यार्थ्यांचे भविष्य घडवण्यासोबतच त्यांच्यातील उपजत कलागुणांना वाव देण्याचे महत्त्वाचे काम करत असून त्यांचे मोलाचे योगदान आहे.

यावेळी फडणवीस यांच्या हस्ते 'पाथेयङ्क द गोल्डन एलिक्सिर' या ई-स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. तसेच, शिक्षण आणि संस्कृती क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समर्पित व्यक्तींना प्रतिष्ठित 'नचिकेता' आणि 'सुपर नचिकेता' पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

थोडक्यात

तडीपार आरोपीच्या खापरखेडा पोलिसांनी आवळल्या मुसक्या

दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा



दगडी चाळ प्रकरणानंतर दोन वर्षांसाठी तडीपार करण्यात आलेला अक्षय उर्फ डग्गम पुरुषोत्तम भोसकर वय ३०, रा.वार्ड क्रमांक २ खापरखेडा व त्याचा मित्र पुनीत उर्फ पुन्हा राजू भगत वय २६ रा वार्ड क्रमांक २ जयभोले नगर खापरखेडा यांच्या स्थानिक पोलीस स्टेशन हद्दीतील नांदा परिसरात असलेल्या मातोश्री बारमधून २२ ऑक्टोबर गुरुवारला रात्री उशिरा खापरखेडा पोलिसानी मुसक्या आवळल्या त्यामुळे खापरखेडा परिसरात तडीपार आरोपींचा वावर असल्याचे निष्पन्न झाले आहे. २ ऑगस्ट रोजी दगडी चाळ गँगवार प्रकरण घडले. या प्रकरणाला कारणीभूत असलेल्या पाच आरोपीना तडीपार करण्यात आले होते गुरुवारला रात्री खापरखेडा पोलीस ठाण्यातील डीबी पथक पेट्रोलिंगवर असताना तडीपार आरोपी अक्षय उर्फ डग्गम पुरुषोत्तम भोसकर व त्याचा मित्र पुनीत उर्फ पुन्हा राजू भगत मातोश्री बियरबारमध्ये येणार असल्याची माहिती मिळाली.

दबा धरून बसलेल्या डीबी पथकाने तडीपार आरोपी अक्षय व त्याचा मित्र पुनीत मातोश्री बियर बार बाहेर दिसताच त्याला ताब्यात घेतले रात्री उशिरा तडीपार आरोपी अक्षय व पुनीत रेकार्ड वरील गुन्हेगार असू बीएनएस १४२, १२२, १७० कलमानव्ये कार्यवाही करण्यात आली असून तडीपार आरोपी अक्षयला मध्यप्रदेश येथील लोदीखेडा येथे सोडण्यात येणार असल्याची माहिती मिळाली आहे. सदरची कार्यवाही वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बुवा यांच्या मार्गदर्शनाखाली संदीप सगने, आशिष मेश्राम, शेखर वानखेडे यांनी केली.

पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणीचे आज आयोजन

सुमारे ७ लाख परीक्षार्थी होणार प्रविष्ट

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

केंद्र शासन पुरस्कृत 'उल्लास-नव भारत साक्षरता कार्यक्रम' अंतर्गत राज्यातील असाक्षर व्यक्तींसाठी रविवार, दि. २५ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. या परीक्षेसाठी संपूर्ण राज्यातून सुमारे ७ लाख परीक्षार्थी प्रविष्ट होणार असल्याची माहिती राज्य साक्षरता अभियान प्राधिकरणाने दिली आहे. या परीक्षेच्या पूर्वतयारीचा आणि नियोजनाचा आढावा घेण्यासाठी दि. १५ ऑक्टोबर २०२६ रोजी शिक्षण संचालक (योजना), महाराष्ट्र राज्य तथा सदस्य सचिव, राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील सर्व शिक्षणाधिकारी (योजना) व त्यांच्या अधिनस्थ क्षेत्रीय अधिकाऱ्यांची एक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

परीक्षेच्या नियोजनानुसार, ही परीक्षा मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती, उर्दू, कन्नड, तेलुगू, तामिळ आणि बंगाली अशा एकूण ९ भाषांच्या माध्यमातून घेतली जाणार आहे. वय वर्षे १५ किंवा अधिक वयाच्या नोंदणीकृत व्यक्ती या परीक्षेसाठी पात्र असून, प्रत्यक्ष पेपरसाठी ३ तासांचा कालावधी देण्यात आला आहे, तर दिव्यांग परीक्षार्थ्यांसाठी ६० मिनिटे अधिक वेळ असणार आहे. ही परीक्षा एकूण १५० गुणांची असून यामध्ये भाग 'क': वाचन (५० गुण), भाग 'ख': लेखन (५० गुण) आणि भाग 'ग': संख्याज्ञान (५० गुण) यांचा समावेश आहे. ज्या शाळांमधून असाक्षरांची ऑनलाइन नोंदणी झाली आहे, ती प्रत्येक शाळा या परीक्षेसाठी अंमलबजावणी एकक (परीक्षा केंद्र) असेल. परीक्षार्थ्यांनी स्वतःचे आधार कार्ड, मतदान ओळखपत्र अथवा बँक पासबुक यापैकी एक ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे. परीक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिकांची तपासणी शाळास्तरावरच करण्यात येईल आणि त्यांचे मूल्यांकनाचे गुण उल्लास पोर्टलवर ऑनलाइन भरले जातील. ही परीक्षा उत्तीर्ण केल्यानंतर एनआयओएस अथवा एसआयओएसच्या माध्यमातून इयत्ता ३ री, ५ वी, ८ वी, १० वी व १२ वी ची परीक्षा देऊन नवसाक्षर हे शिक्षणाच्या मूळ प्रवाहात दाखल होऊ शकतात. असाक्षरांनी शिक्षणासाठी नजीकच्या शाळेच्या मुख्याध्यापकांमार्फत नोंदणी करावी व या कार्यक्रमांतर्गत साक्षर होऊन पुढील शिक्षणाचा लाभ घ्यावा. राज्यातील जास्तीत जास्त नवसाक्षरांनी या परीक्षेला उपस्थित राहून साक्षरतेचे प्रमाणपत्र मिळवावे, असे आवाहन शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

वाहन परवान्यासाठी सारथी ४.० प्रणालीवर आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे बंधनकारक

ई-रिक्षा, ई-कार्टसह विविध सेवांसाठी नियमांत बदल

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

वाहन चालविण्याच्या अनुज्ञप्तीशी (ड्रायव्हिंग लायसन्स) संबंधित विविध सेवांसाठी अर्ज करताना सारथी ४.० या संगणक प्रणालीवर आवश्यक कागदपत्रे अद्ययावत करणे बंधनकारक करण्यात आले आहे. केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मधील तरतुदींनुसार १५ ऑक्टोबर २०२६ पासून या प्रक्रियेत बदल लागू करण्यात आले आहेत. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली येथील संचालकांसोबत १६ जुलै रोजी झालेल्या चर्चेनुसार, विद्यमान अनुज्ञप्तीवरील सेवांसाठी अर्ज करताना मूळ वाहन चालविण्याची अनुज्ञप्ती, शिकाऊ अनुज्ञप्ती किंवा वाहक अनुज्ञप्ती अपलोड करण्याची अट हटविण्यात आली आहे. हा बदल सर्व राज्यांमध्ये लागू करण्यात आला आहे.

ई-रिक्षा आणि ई-कार्टसाठी प्रशिक्षण प्रमाणपत्र आवश्यक

ई-रिक्षा किंवा ई-कार्ट वर्गातील वाहनांसाठी नवीन अनुज्ञप्ती अथवा अतिरिक्त वाहन वर्गाची नोंदणी करण्यासाठी अर्जदाराने अधिकृत वाहन प्रशिक्षण संस्थेकडून किंवा ई-रिक्षा व ई-कार्ट व्यवसायाचे प्रमाणपत्र असलेल्या अधिकृत वाहन विक्रेत्याकडून किमान १० दिवसांचे प्रशिक्षण घेतल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. ई-रिक्षा किंवा ई-कार्ट परिवहन संवर्गातील नवीन अनुज्ञप्तीसाठी अर्ज करताना नमुना १-अ अपलोड करणेही अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच, परिवहन संवर्गातील कोणत्याही वाहन वर्गासाठी अतिरिक्त वाहन वर्गाची नोंदणी करताना लागू असलेल्या नियमांनुसार आवश्यक कागदपत्रे सादर करावी लागतील. वाहन चालविण्याच्या अनुज्ञप्तीचे पुनःवेंध करण्यासाठी अतिरिक्त उजळणी प्रशिक्षण अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच, निलंबित अनुज्ञप्तीवरील निलंबन उठविण्यासाठी अर्ज करतानाही उजळणी प्रशिक्षण घेतल्याचे प्रमाणपत्र सादर करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

नांदा येथील ३२ तोळे सोने, ६५ तोळे चांदीसह रोकड लंपास! १० महिने उलटूनही चोरटे मोकाट

खापरखेडा पोलिसांच्या तपासावर प्रश्नचिन्ह

दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा



नांदा येथील एका घराचे कुलूप तोडून ३२ तोळे सोने ६५ तोळे चांदीचे दागिने आणि ९२ हजार रुपयांची रोकड असा लाखो रुपयांचा ऐवज लंपास करणाऱ्या चोरट्यांचा १० महिन्यांहून अधिक काळ लोटूनही शोध लागलेला नाही, १८ ऑक्टोबर २०२५ रोजी घडलेल्या या घरफोडी प्रकरणात अद्याप आरोपींना अटक करण्यात आलेली नसल्याने खापरखेडा पोलिसांच्या तपासावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. चोरीला गेलेली आयुष्यभराची पुंजी परत मिळावी,यासाठी पीडित कुटुंबाने आता आक्रमक भूमिका घेतली असून वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे दाद मागण्याचा इशारा दिला आहे, खापरखेडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नांदा येथील रहिवासी सुरेश चिरकुटराव भोसले यांच्या घरी १८ ऑक्टोबर २०२५ रोजी अज्ञात चोरट्यांनी घरफोडी केली होती. घरातील कपाटाचे कुलूप तोडून चोरट्यांनी ३२ तोळे सोने ६५ तोळे चांदीचे दागिने आणि ९२ हजार रुपयांची रोकड चोरून नेली.

या घटनेप्रकरणी खापरखेडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता,मात्र,इतका मोठा ऐवज चोरीला जाऊनही अद्याप चोरट्यांचा सुगावा लागलेला नाही,घरफोडीच्या घटनेनंतर घटनास्थळावरील पुरावे, सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक तपासाच्या माध्यमातून आरोपींपर्यंत पोहोचणे अपेक्षित होते,मात्र,दहा महिन्यांहून अधिक कालावधी उलटूनही आरोपींचा शोध लागलेला नसल्याने तपास नेमका कोणत्या दिशेने सुरू आहे, असा सवाल उपस्थित होत आहे,चोरीला गेलेल्या दागिन्यांचाही अद्याप शोध लागलेला नसल्याने भोसले कुटुंबीय चिंतेत आहेत. या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर सुरेश भोसले यांनी खापरखेडा पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांना सविस्तर निवेदन सादर केले आहे.आतापर्यंतच्या तपासाची सद्यस्थिती काय आहे, संशयितांची चौकशी आणि कॉल डेटा तपासातून काय निष्पन्न झाले.

तसेच पुढील तपासाची दिशा काय आहे,याची स्पष्ट माहिती देण्याची मागणी त्यांनी केली आहे. आमच्या घरातील आयुष्यभराची पुंजी चोरीला गेली असून आम्ही भीतीच्या वातावरणात जगत आहोत. पोलिसांनी या प्रकरणाचा तातडीने आणि निष्पक्ष तपास करून आरोपींना अटक करावी, तसेच चोरीला गेलेला मुद्देमाल परत मिळवून द्यावा, अशी मागणी पीडित कुटुंबाने केली आहे. या प्रकरणात तातडीने कारवाई न झाल्यास वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे न्याय मागणार असल्याचा इशारादेखील भोसले कुटुंबीयांनी दिला आहे.

ढोल-ताशांच्या गजरात गणेशपूर येथील शारदा मातेचे नवतलावात शांततेत विसर्जन

आमगाव तालुक्यात भक्तिमय वातावरणात शारदा माता विसर्जन सोहळा उत्साहात संपन्न

दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव : गोंदिया जिल्ह्यातील आमगाव तालुक्यात असलेल्या गणेशपूर येथे शारदा महिला मंडळातर्फे शारदा मातेच्या विसर्जन सोहळ्याला भक्तिमय वातावरणात उत्साहाने सुरुवात झाली. ढोल-ताशांच्या गजरात आणि जयघोषात शारदा मातेची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी भाविकांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग घेतला. मिरवणुकीदरम्यान परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि शारदा माता की जयच्या जयघोषात शारदा मातेच्या मूर्तीचे नवतलाव येथे शांततेत व शांतातापूर्ण वातावरणात विसर्जन करण्यात आले. शारदा माता विसर्जन सोहळा शांततेत पार पडल्याने भाविकांमध्ये समाधानाचे वातावरण होते. धार्मिक उत्साह, श्रद्धा आणि भक्तिभावाने गणेशपूर येथील शारदा माता विसर्जन सोहळ्याची सांगता झाली.



यावेळी शारदा उत्सव महिला मंडळ अध्यक्ष प्रमिला मारबदे उपाध्यक्ष सकुन बागडे सचिव ममता बिसेन तसेच सदस्य माया बागडे कविता डोंगरवार शीला डोंगरवार कला धकाते जिरन ब्राह्मणकर मोता मारबदे लीला ठाकरे, कांतु गुज्जर, गोपाल ठाकरे, रामेश्वर बिसेन, दुलीचंद मारबदे, विनोद तावाडे, राधेश्याम बिसेन, सतीश ब्राह्मणकर, राजेश धकाते, ओमप्रकाश आगासे, चिंतामण लावाबुरे व इतर पदाधिकारी व सदस्य तसेच गावकरी उपस्थित होते.

मुंबई महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना समन्वय समितीचा भव्य मोर्चा यशस्वी!

राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना व सानुग्रह अनुदान (बोनस) मागणीबाबत सकारात्मक निर्णय



दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई

बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने कामगार, कर्मचारी, अधिकारी, अभियंते, परिचारीका, परिसेविका, तंत्रज्ञ, सुरक्षा रक्षक, शिक्षक आणि महापालिकेतील सर्व कर्मचारी यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, यासाठी समन्वय समिती प्रयत्न करीत आहे. म.न.पा. प्रशासनाने डीसी-१ कर्मचाऱ्यांचे १०% व म.न.पा.चे १४% प्रमाणे अंशदायी निवृत्ती योजनेमध्ये कापून घेण्यात आलेला निधी रुपये ६,२३९.०८ कोटी राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेमध्ये वर्ग करण्याच्या अनुषंगाने दि. १५/०९/२०२६ रोजी मा. स्थायी समितीने ठराव क्र. ९८९ मंजूर केलेला आहे. सदर ठराव मुंबई महापालिकेच्या महासभेत मंजूरीसाठी दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी विषय क्र. २० अन्वये ठेवण्यात येणार होता, तो स्थगित करण्यात यावा तसेच महापालिकेच्या समस्त कामगार, कर्मचारी, अधिकाऱ्यांना दिवाळी सणापूर्वी वाढीव सानुग्रह अनुदान (बोनस) मिळावा या मागणीकरीता समन्वय समितीच्या नेतृत्वाखाली भव्य मोर्चा महापालिका मुख्यालय, आझाद मैदान येथे आयोजित करण्यात आला होता.

सवर मोर्चाचे शिष्टमंडळ आपल्या मागण्यांचे निवेदन बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सभागृह नेते गणेश खणकर साहेब, महापौर रितू तावडे, विरोधी पक्ष नेत्या किशोरीताई पेडणेकर यांची भेट घेऊन सादर करण्यात आले.

त्यावेळी समन्वय समितीच्या शिष्टमंडळासमवेत तीन्ही मान्यवरांसमवेत सकारात्मक चर्चा होऊन चर्चे अंती, राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना मध्ये पैसे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव आजच्या सभेत घेण्यात येणार नाही सवर प्रस्ताव 'नॉट टेकन' म्हणून घेण्यात येईल तसेच दिवाळी सणापूर्वी म.न.पा.च्या समस्त कामगार, कर्मचारी, अधिकाऱ्यांना किमान ५०,०००/- सानुग्रह अनुदान (बोनस) मिळावा अशी विनंती केली असता, सभागृह नेते गणेश खणकर, महापौर रितू तावडे, विरोधी पक्ष नेत्या किशोरीताई पेडणेकर यानी असे आश्वासित केले की, दिवाळी सणापूर्वी सानुग्रह अनुदान (बोनस) वेण्याची महापालिकेची परंपरा असून ती आम्ही यावर्षीही राखणार आहोत व गेल्यावर्षीपेक्षा जास्त बोनस लवकरात लवकर जाहीर करू असे सांगण्यात आले.

राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना बाबतचा ठराव आजच्या सभेत घेण्यात येणार नाही तसेच दिवाळी सणापूर्वी वाढीव बोनस मिळणार, या दोन्ही मागण्या मान्य झाल्यामुळे आजचे आंदोलन यशस्वी झाले आहे. सदर आंदोलनामध्ये महापालिकेतील समस्त कामगार, कर्मचारी, अधिकारी, अभियंते, परिचारीका, परिसेविका, तंत्रज्ञ, सुरक्षा रक्षक, शिक्षक आणि महापालिकेतील सर्व कर्मचारी यांनी प्रचंड संख्येने सहभागी झाल्याबद्दल व सदर मोर्चा यशस्वी केल्याबद्दल समन्वय समितीच्यावतीने मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

आजच्या मोर्चाचे नितृत्व समन्वय समितीचे नेते बाबा कदम, वामन कविस्कर, अशोक जाधव, शशांक राव, दिवाकर वळवी, रमाकांत बने, रंगनाथ सातवसे, के. पी. नाईक, नवनाथ घाडगे, त्रिशिला कांबळे, उमेश भोयर, हेमंत कदम, कल्पना गजुला, सी. एस. गजुला, प्रकाश जाधव, यशवंत धुरी, संजय यशवंत कापसे, देविदास लोखंडे उपस्थित होते.

थोडक्यात

प्रतापगड येथील आरोपीला दोन स्वतंत्र गुन्ह्यांत शिक्षा, एका प्रकरणात जन्मठेप

केशोरी पोलिसांच्या तपासाला यश, अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणात न्यायालयाचा कठोर निकाल

दै. सिंहवाणी वृत्त, केशोरी

प्रतापगड (ता. अजुनी मोरगाव, जि. गोंदिया) येथील उमेश राजू रामटेके (वय ३६) याला दोन स्वतंत्र गुन्ह्यांमध्ये जिल्हा व सत्र न्यायालय, उख-3 यांनी दोषी ठरवून शिक्षा सुनावली आहे. यापैकी स्वतःच्या नऊ वर्षीय मुलीवरील लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणात आरोपीला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली, तर दुसऱ्या प्रकरणात अल्पवयीन मुलीचा विनयभंग व धमकी दिल्याप्रकरणी विविध कलमांखाली सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. दोन्ही प्रकरणांचे निकाल २३ ऑक्टोबर २०२६ रोजी लागले. केशोरी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५७/२०२५ अन्वये भारतीय न्याय संहिता व बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात आरोपीने स्वतःच्या नऊ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचा तसेच आपल्या आईवर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार करून तिला व मुलांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप होता.

या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक संदीप भोसले यांनी केला. सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील सतीश घोडे व चुटे यांनी बाजू मांडली. न्यायालयाने आरोपीला भारतीय न्याय संहितेच्या कलम ६४(२)(I) अंतर्गत १५ वर्षे सश्रम कारावास व ३ हजार रुपये दंड, ढडउरड कायद्याच्या कलम ६ अंतर्गत जन्मठेप व ५ हजार रुपये दंड, तसेच इतर कलम ३५१(३) अंतर्गत पाच वर्षे सश्रम कारावास व २ हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली. दुसऱ्या प्रकरणात, गुन्हा क्रमांक ३३/२०२४ अन्वये आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहिता व ढडउरड कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. १२ एप्रिल २०२४ रोजी रात्री प्रतापगड येथे १७ वर्षे ५ महिने वयाची पीडिता घरी झोपलेली असताना आरोपीने घरात अनधिकृत प्रवेश केला. त्यानंतर पीडितेशी गैरवर्तन करून शारीरिक सुखाची मागणी केली व तिचा हात पकडून तिचा विनयभंग केल्याचा आरोप होता.

या गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अभिजीत जोगदंड यांनी केला. सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील सतीश घोडे व चुटे यांनी बाजू मांडली. न्यायालयाने आरोपीला नमूद विविध कलमांखाली तीन ते पाच वर्षांपर्यंत सश्रम कारावास व दंडाची शिक्षा सुनावली. त्यामध्ये भादंवि कलम ४५० अंतर्गत पाच वर्षे, कलम ३५४ अंतर्गत तीन वर्षे, कलम ५०६ अंतर्गत तीन वर्षे आणि ढडउरड कायद्याच्या कलम ८ अंतर्गत तीन वर्षे व कलम १२ अंतर्गत दोन वर्षे सश्रम कारावासाचा समावेश आहे. दोन्ही प्रकरणांत केशोरी पोलीस ठाण्याच्या पथकाने तपासाची कार्यवाही केली. न्यायालयीन कामकाजासाठी पोलीस ठाण्याच्या कोर्ट पैरवी अधिकारी महिला पोलीस शिपाई पुनम ठाकरे यांनी काम पाहिले. उत्कृष्ट तपासाबाबत गोरख भामरे, पोलीस अधिक्षक, गोंदिया, अभय डोंगरे, अपर पोलीस अधिक्षक, गोंदिया, मा. राजेश तटकरे, उपविभागीय पोलीस अधिकारी देवरी, पोलीस स्टेशन केशोरीचे ठाणेदार, सहाय्यक पोलीस निरिक्षक चेतन ढेकणे यांनी कौतुक केले आहे. दोन स्वतंत्र गुन्ह्यांतील निकाल एकाच दिवशी लागल्याने या प्रकरणांकडे परिसराचे लक्ष वेधले गेले आहे.

माळी समाजाचा उपवर युवक-युवती परिचय मेळावा आता १५ नोव्हेंबरला

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

माळी समाजाच्या वतीने आयोजित करण्यात येणारा उपवर युवक- 'युवती परिचय मेळावा आता रविवार, १५ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. यापूर्वी हा मेळावा रविवार, १ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात येणार होता. मात्र, काही अपरिहार्य कारणांमुळे कार्यक्रमाच्या तारखेत बदल करण्यात आला आहे. हा परिचय मेळावा गीता मंदिर, सुभाष रोड काटन मार्केट नागपूर येथे सकाळी १० वाजता होणार आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून विवाह योग्य युवक - युवतींना एकमेकांची माहिती जाणून घेण्याची आणि विवाहासाठी योग्य स्थळ शोधण्याची संधी उपलब्ध होणार आहे. तरी माळी समाजातील सर्व समाजबांधवांनी या बदलाची नोंद घ्यावी, असे आवाहन आयोजक गोविंदराव वैराळे, मधुसूदन देशमुख आणि कैलास जामगडे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९४२३१०९९४१ या क्रमांकावर संपर्क करू शकता.

स्पंदन कल्याणकारी बहुउद्देशीय संस्थेच्या राज्यस्तरीय पुरस्काराचे सोमवारी वितरण

डॉ. भालचंद्र नेमाडे यांचे व्याख्यान आणि मुलाखत

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

विदर्भ सांस्कृतिक प्रबोधिनी आणि स्पंदन कल्याणकारी बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त



ज्येष्ठ साहित्यिक डॉ. भालचंद्र नेमाडे यांच्या हस्ते स्पंदन संस्थेच्या राज्यस्तरीय पुरस्कारांच्या वितरणाचा सोहळा सोमवार, २६ ऑक्टोबर रोजी सायं ५ वाजता, स्पंदन विशेष मुलांची शाळा,गिरी बालाजी नगर, साईनगर १ च्या पुढे, हुडकेश्वर रोड, नागपूर येथे आयोजित करण्यात आलेला आहे.

स्पंदन संस्कृती-साहित्य कृथार्थ जीवन गौरव पुरस्कार मान्यवर डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, लोकनाथ यशवंत, नरेंद्र जिचकार, डॉ. सुभाष गवई, डॉ प्रमोद मुनघाटे, डॉ. प्रफुल्ल शिलेदार, शाम पेठकर, ज्ञानेश्वर रक्षक, अनिल मालोकर, प्रभाकर आंबोने, डॉ. बळवंत भोयर, डॉ. नीलकांत कुलसंगे, गुरु कौशल, धनराज हरडे,व शैलेश पांडे यांना प्रदान करण्यात येणार आहेत. तर स्पंदन साहित्य संस्कृती गौरव पुरस्कार हे प्रतापराव वाघमारे, श्रीमंत माने, देवा झिंझाड, सुनीता झाडे, डॉ. सना पंडीत, रवींद्र भुयार, कल्याणकुमार डहाट, संजय जीवने, नानू नेवरे, सीताराम राऊत, नरेश गडेकर यांना प्रदान करण्यात येणार आहे. या नंतर मराठी भाषेची सद्यस्थिती या विषयावर वर डॉ. भालचंद्र नेमाडे यांचे स्वतंत्र व्याख्यान करतील व नंतर डॉ. नेमाडे यांच्याशी डॉ प्रमोद मुनघाटे व शाम पेठकर हे संवाद साधतील. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बळवंत भोयर, डॉ. सना पंडीत व अनिल मालोकर करतील. साहित्य प्रेमींनी या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग सोनवणे यांनी केले आहे.

माणुसकीचा अखेरचा आधार! निराधार आजीच्या पार्थिवाला हितेश बनसोड यांचा खांदा, मुलगा प्रहारने दिला मुखाग्नी

खापरखेडा येथून सावनेरपर्यंत धाव, नातेवाईक नसलेल्या आजीवर सन्मानाने अंत्यसंस्कार करून सामाजिक कार्यकत्यार्ने जपली माणुसकी

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

जगण्याच्या प्रवासात माणसाला अनेक नाती मिळतात; मात्र मृत्यूनंतर अखेरचा निरोप देण्यासाठीही कोणी जवळ नसावे, यापेक्षा मोठे दुर्दैव कोणते? अशाच एका निराधार आजीच्या आयुष्याचा शेवट झाला. तिच्या निधनानंतर अंत्यसंस्कारासाठी पुढे येत सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांनी माणुसकीचे दर्शन घडवले. विशेष म्हणजे, त्यांच्या मुलगा प्रहार हितेश बनसोड याने आजीला मुखाग्नी देत तिला अखेरचा निरोप दिला. या घटनेने उपस्थितांचे मन हेलावून गेले.

दि. २४ ऑक्टोबर रोजी खापरखेडा येथील मयूर तिरपुडे यांचा सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांना फोन आला.



खापरखेडा येथील डॉ. केळवदे यांच्याकडे उपचारासाठी आलेल्या एका वृद्ध आजीचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची माहिती त्यांना देण्यात आली. मृत आजीला गेल्या काही वर्षांपासून जुन्या दम्याचा त्रास होता आणि त्यांच्यावर संबंधित डॉक्टरांकडे उपचार सुरू असल्याची माहिती मिळाली.

आजीबाबत अधिक चौकशी केली असता, त्यांच्या संपर्कात कोणीही नातेवाईक नसल्याचे आणि त्या निराधार असल्याचे समोर आले. मृत्यूनंतर अंत्यसंस्काराची जबाबदारी कोण घेणार, हा प्रश्न निर्माण झाला. मात्र, ही माहिती मिळताच हितेश बनसोड यांनी क्षणाचाही विलंब न करता खापरखेडा गाठले.

कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून सन्मानाने अखेरचा निरोप

खापरखेडा येथे पोहोचल्यानंतर बनसोड यांनी आजीच्या पार्थिवाची जबाबदारी स्वीकारली. त्यानंतर खापरखेडा पोलीस ठाण्यात आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. पुढे आजीचे पार्थिव सावनेर येथील राम गणेश गडकरी स्मशानभूमीत आणण्यात आले. तेथे सर्व आवश्यक विधी पार पाडून आजीवर अंत्यसंस्कार करण्यात आले.

मृत आजीचे नाव सावित्रीबाई सुकलाल टेकाम (वय ८०) असे असून, त्या चनकापूर, सिलेवाडा, वार्ड क्रमांक २, तहसील सावनेर, जिल्हा नागपूर येथील रहिवासी होत्या.

या अंत्यसंस्कारावेळी हितेश बनसोड यांचा मुलगा प्रहार हितेश बनसोड याने आजीला मुखाग्नी दिला. एखाद्या रक्ताच्या नात्यापेक्षाही माणुसकीचे नाते मोठे असते, याची प्रचिती या प्रसंगातून आली. ज्या आजीच्या अखेरच्या क्षणी सोबत राहण्यासाठी कोणी नव्हते, त्यांना अखेरचा निरोप देण्यासाठी एक कुटुंब पुढे आले, ही बाब मनाला स्पर्श करणारी ठरली.

५० हून अधिक निराधार व्यक्तींवर अंत्यसंस्कार

सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड हे हितज्योती आधार फाउंडेशनच्या माध्यमातून बेघर, बेवारस, निराधार, अनाथ, दिव्यांग आणि अपघातग्रस्त व्यक्तींसाठी कार्य करतात. समाजात दुर्लक्षित राहिलेल्या व्यक्तींना मदतीचा हात देण्यासोबतच, मृत्यूनंतर कोणीही वाली नसलेल्या व्यक्तींवर सन्मानाने अंत्यसंस्कार करण्याचे कार्यही ते सातत्याने करीत आहेत. आजपर्यंत त्यांनी ५० हून अधिक निराधार व्यक्तींवर अंत्यसंस्कार केल्याची माहिती आहे. या कार्यात ज्योती हितेश बनसोड, प्रहार हितेश बनसोड, रुद्राक्षी हितेश बनसोड, अभिषेक कोठाडे, आकाश यादव, आर्यन कातकडे, नरेंद्र समदुरकर आणि राजेश सिदेवार यांनी सहकार्य केले.

निराधारांसाठी माणुसकीची सावली

सावित्रीबाई टेकाम यांच्या आयुष्याचा शेवट झाला; मात्र त्यांना मिळालेला हा अखेरचा सन्मान समाजाला एक महत्त्वाचा संदेश देऊन गेला. माणूस जिवंत असताना त्याला आधार देणे जितके महत्त्वाचे, तितकेच मृत्यूनंतर त्याला सन्मानाने निरोप देणेही महत्त्वाचे आहे. जिथे नाती संपतात, तिथे माणुसकीची सुरुवात होऊ शकते, हे हितेश

गौरवगाथा प्रत्येकाची लिहिली जाते, फक्त कर्तृत्व असावे लागते! : लेखिका मनिषा कांबळे

डॉ. बी. एन. खरात यांच्या कार्याचे केले विशेष कौतुक

दै. सिंहवाणी वृत्त, कोल्हापूर

माणसाने आपल्या कर्तव्याच्या वाटेवर प्रामाणिकपणे चालत राहावे. कोणत्याही अपेक्षेशिवाय, प्रसिद्धीचा मोह न ठेवता 'नेकी कर, दरिया में डाल' या भावनेतून काम करत राहावे. आपल्या कामाची दखल कधी, कोण आणि कशी घेईल, हे सांगता येत नाही; मात्र कर्तृत्व प्रामाणिक असेल, तर त्याची गौरवगाथा नक्कीच लिहिली जाते, असे प्रतिपादन लेखिका, कवयित्री व समीक्षक मनिषा कांबळे यांनी केले.

कोल्हापूर येथील छत्रपती शाहू स्मारक नाट्यगृह, दसरा चौक येथे रविवार, १८ ऑक्टोबर रोजी आयोजित 'कृतज्ञता सन्मान पर्व २०२६ - भारत कर्तव्यम् गौरवगाथा' या सोहळ्यात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या.

वावेळी त्यांनी आयोजक डॉ. बी. एन. खरात यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले. माणसं शोधणं आणि माणसं घडवणं ही मोठी कला आहे. डॉ. बी. एन. खरात हे या कलेतील कुशल शिल्पकार आहेत, अशा शब्दांत त्यांनी खरात सरांच्या कार्यकर्तृत्वाचे वर्णन केले.

समाजात अनेक व्यक्ती



निःस्वार्थ भावनेने आपापल्या क्षेत्रात काम करत असतात. त्यांच्या कार्याला योग्य व्यासपीठ मिळणे आणि कर्तृत्वाची दखल घेतली जाणे महत्त्वाचे असते. अशा व्यक्तींमधील गुण ओळखून त्यांना पुढे आणण्याचे काम खरात सर करतात. त्यांच्या या कार्यामुळे अनेकांना नवी ओळख मिळते, आत्मविश्वास वाढतो आणि आणखी चांगले काम करण्याची प्रेरणा मिळते, असे मनिषा कांबळे यांनी नमूद केले.

पुरस्कार म्हणजे शेवट नव्हे, नव्या जबाबदारीची सुरुवात!

पुरस्कार मिळाला म्हणजे आपली जबाबदारी संपली, असे समजू नये. उलट, मिळालेला सन्मान हा अधिक चांगले काम करण्यासाठी बळ देणारा असतो. पुरस्कारामुळे आपल्या कार्याची दखल घेतली गेल्याचे समाधान मिळते; पण त्याच वेळी समाजाप्रती असलेली जबाबदारीही वाढते. त्यामुळे सन्मानाने थांबून न राहता अधिक जोमाने आणि निष्ठेने काम करत राहिले पाहिजे, असा मोलाचा संदेश कांबळे यांनी दिला.

डॉ. बी. एन. खरात यांच्यासारखे व्यक्तिमत्त्व आपल्या कार्याची दखल घेईल, यासाठी कामाची प्रसिद्धी करण्यापेक्षा कामाचा दर्जा वाढविण्यावर भर द्यावा. कर्तृत्वातून आपली ओळख निर्माण करावी. योग्य व्यक्ती योग्य वेळी आपल्याला शोधून काढतात, हा विश्वास प्रत्येकाने मनात ठेवावा, असेही त्यांनी सांगितले.

पंखांत ऊर्जा भरणारे व्यक्तिमत्त्व

डॉ. बी. एन. खरात हे केवळ व्यक्तींचा सन्मान करणारे आयोजक नसून, त्यांच्या कार्यालयी प्रोत्साहन देऊन पुढील वाटचालीसाठी प्रेरणा देणारे व्यक्तिमत्त्व असल्याची भावना कांबळे यांनी व्यक्त केली. त्यांच्या उपक्रमांमुळे अनेकांना आपल्या कार्याची नवी जाणीव होते आणि पुढील प्रवासात अधिक चांगले काम करण्याची ऊर्जा मिळते, असे त्यांनी नमूद केले.

कोल्हापूरसारख्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परंपरा लाभलेल्या शहरात प्रमुख पाहुण्या म्हणून सहभागी होता आल्याचा आनंदही त्यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमामुळे विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या व्यक्तींशी संवाद साधण्याची आणि कर्तृत्वाचा सन्मान करणाऱ्या उपक्रमाचा भाग होण्याची संधी मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

मनिषा कांबळे यांच्या भाषणातून कर्तव्यनिष्ठा, निःस्वार्थ कार्य, कर्तृत्वाची ओळख आणि पुरस्कारानंतरही सुरू राहणाऱ्या सामाजिक जबाबदारीचे महत्त्व अधोरेखित झाले. आपले काम प्रामाणिकपणे करत राहणे आणि सन्मानाला नव्या जबाबदारीची सुरुवात मानणे, हाच खऱ्या गौरवगाथेचा पाया आहे, हा विचार त्यांच्या भाषणातून प्रभावीपणे पुढे आला.

पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर रब्बी हंगामात पिकांची निवड व पाणी व्यवस्थापनाचे योग्य नियोजन करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

यंदाच्या पर्जन्यमानातील घट आणि अल-निनोच्या प्रभावामुळे निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, रब्बी हंगामातील पीक नियोजन करताना शेतकऱ्यांनी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने व कार्यक्षमतेने वापर करावा. उपलब्ध पाण्याचा साठा, जमिनीचा प्रकार, पाण्याची उपलब्धता आणि स्थानिक हवामान परिस्थितीचा विचार करूनच शेतकऱ्यांनी रब्बी पिकांची पेरणी करण्याचे आवाहन नागपूरच्या जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी डॉ. अर्चना कडू यांनी केले आहे. रब्बी हंगामात पिकांची निवड करताना कमी पाण्यात येणाऱ्या तसेच कमी कालावधीत परिपक्व होणाऱ्या पिकांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. ज्या शेतकऱ्यांकडे सिंचनासाठी मर्यादित पाणी उपलब्ध आहे, त्यांनी गहू वांसारख्या तुलनेने अधिक पाण्याची गरज असलेल्या पिकांचे क्षेत्र उपलब्ध पाण्यानुसार निश्चित करावे. तसेच हरभरा, करडई, जवस, तीळ, ज्वारी, बाजरी, मका व सूर्यफूल यांसारख्या कमी पाण्यात घेता येणाऱ्या पिकांचा स्थानिक परिस्थितीनुसार विचार करावा. पौष्टिक चिया आणि जनावरांसाठी चारा पिकांचे योग्य नियोजन करावे. पीक निवड करताना संबंधित जमिनीचा प्रकार, उपलब्ध सिंचन व्यवस्था, पेरणीचा योग्य कालावधी, वाणाची वैशिष्ट्ये आणि कृषी विभागाच्या शिफारशी विचारात घ्याव्यात.

रब्बी हंगामातील पेरणीपूर्वी शेतातील उपलब्ध ओलावा, विहिरी व बोअरवेलमधील पाणीसाठा तसेच सिंचनासाठी उपलब्ध पाण्याचे योग्य मूल्यमापन करावे. उपलब्ध पाण्याच्या प्रमाणानुसार पेरणीखालील क्षेत्र निश्चित करावे. पाण्याची खात्रीशीर उपलब्धता नसताना मोठ्या क्षेत्रावर पाणी जास्त लागणारी पिके घेणे टाळावे. हरभरा, करडई, जवस तसेच स्थानिक परिस्थितीनुसार योग्य असलेल्या इतर कमी पाण्याच्या पिकांना प्राधान्य द्यावे. संत्रा पिकामध्ये आच्छादनाचा वापर करावा.पिकांना आवश्यकतेनुसारच पाणी द्यावे. ठिबक सिंचन, तुषार सिंचन आणि इतर सूक्ष्म सिंचन पद्धतींचा शक्य तेथे वापर करून पाण्याची बचत करावी. जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आंतरमशागत, कोळपणी व तण नियंत्रण यांसारख्या उपायांचेजना योग्य वेळी करावयात. रब्बी ज्वारीच्या बियाण्यासाठी 'महा डीबीटी'पोर्टलवर अर्ज सादर करावे. विदर्भामध्ये रब्बी हंगामात ज्वारी हे एक अत्यंत महत्त्वाचे पीक असून, धान काढणीनंतर दुहेरी पीक पद्धतीसाठी हा अत्यंत उपयुक्त पर्याय ठरत आहे. धानाच्या खाचरांमध्ये रब्बीतील ओलाव्याचा अचूक वापर करून अन्नधान्य व चाऱ्याची गरज भागवण्यासाठी शेतकऱ्यांनी वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करावा.

पावडदौना परिसरात वाघाची दहशत!

वाघाच्या हल्ल्यात दोन बैलांचा मृत्यू, शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई द्या, शिवसेना तालुकाप्रमुख नितेश वांगे यांची मागणी, राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांना निवेदन

दै. सिंहवाणी वृत्त, मौदा

मौदा तालुक्यातील पावडदौना, वांजरा, मोहखेडी व परिसरात वाघाचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वाघाच्या हल्ल्यात दोन बैलांचा मृत्यू झाल्याच्या घटना समोर आल्याने शेतकरी व पशुपालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. या घटनांची गांभीर्याने दखल घेऊन वनविभागाने वाघाच्या बंदोबस्तासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, तसेच नुकसानग्रस्त बैलमालकांना त्वरित आर्थिक मदत व नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शिवसेनेचे मौदा तालुकाप्रमुख नितेश वांगे यांनी केली आहे.

मौदा तालुक्यातील ग्रामपंचायत वांजरा अंतर्गत येणाऱ्या वांजरा, पावडदौना, मोहखेडी तसेच लगतच्या परिसरात मागील एक वर्षापासून वाघाचा वावर वाढल्याचे सांगण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सागर भोयर (वांजरा) यांच्या मालकीच्या बैलावर दिनांक २१ ऑक्टोबर २०२६ रोजी, तर भामेवाडा येथील चंद्रभान उके यांच्या बैलावर दिनांक २० ऑक्टोबर २०२६ रोजी वाघाने हल्ला करून ठार केल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरात पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या घटनांमुळे संबंधित शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असून, त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

पावडदौना, वांजरा व मोहखेडी परिसरात वाघाचा वावर मानवी वस्तीजवळ असल्याने शेतात जाणारे शेतकरी, शेतमजूर, पशुपालक आणि ग्रामस्थांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. शेतातील कामांसाठी बाहेर पडताना नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून, भविष्यात



मनुष्यावर हल्ला होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. त्यामुळे वनविभागाने परिसरात नियमित गस्त वाढवावी, वाघाच्या हालचालींवर लक्ष ठेवावे, आवश्यक ठिकाणी कॅमेरे लावावेत आणि ग्रामस्थांना सतर्कतेच्या सूचना द्याव्यात. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

नितेश वांगे यांचे राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांना निवेदन या गंभीर परिस्थितीची दखल घेत शिवसेनेचे मौदा तालुकाप्रमुख नितेश वांगे, रा. पावडदौना यांनी दिनांक २२ ऑक्टोबर २०२६ रोजी राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांना निवेदन सादर करून परिसरातील वाघाच्या बंदोबस्तासाठी तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली.

वाघाच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या बैलांमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासकीय नियमानुसार त्वरित आर्थिक मदत व नुकसानभरपाई देण्यात यावी. तसेच वनविभागाने घटनास्थळी पाहणी करून पंचनामा करावा आणि नुकसानग्रस्त पशुपालकांना दिलासा द्यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे. पावडदौना, वांजरा, मोहखेडी आणि परिसरात वाघाच्या वाढत्या वावरामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वाघाच्या हल्ल्यात बैलांचा मृत्यू झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. शेतकरी आधीच विविध अडचणींचा सामना करीत असताना अशा घटनांमुळे त्यांच्यापुढे नवे संकट उभे राहिले आहे.

वनविभागाने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन वाघाच्या बंदोबस्तासाठी तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात. परिसरात गस्त वाढवून वाघाच्या हालचालींवर लक्ष ठेवावे आणि नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे. तसेच वाघाच्या हल्ल्यात बैल गमावलेल्या सागर भोयर, चंद्रभान उके व अन्य नुकसानग्रस्त पशुपालकांना

वनविभागाच्या कारवाईकडे ग्रामस्थांचे लक्ष

वाघाच्या वाढत्या वावरामुळे पावडदौना, वांजरा, मोहखेडी आणि परिसरातील नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे वनविभागाने तातडीने घटनास्थळी पाहणी करून परिस्थितीचा आढावा घ्यावा, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत द्यावी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे. आता वनविभाग या गंभीर परिस्थितीवर कोणती ठोस पावले उचलणार आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना किती लवकर मदत मिळणार, याकडे संपूर्ण परिसरातील ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

नियमानुसार तातडीने आर्थिक मदत व नुकसानभरपाई देण्यात यावी. भविष्यात कोणतीही जीवितहानी होऊ नये, यासाठी प्रशासनाने वेळ न दवडता आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी शिवसेना मौदा तालुकाप्रमुख नितेश वांगे यांनी केली.

थोडक्यात

दिपक देशकर भारतीय युवक काँग्रेसच्या आमगाव तालुका अध्यक्षपदी नियुक्त

खासदार डॉ. नामदेव किरसान यांच्या उपस्थितीत अनेक युवकांचा काँग्रेसमध्ये प्रवेश



दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव : भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या विचारधारेने प्रेरित होऊन दिपक देशकर यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. यावेळी खासदार डॉ. नामदेव किरसान यांच्या प्रमुख उपस्थितीत दिपक देशकर यांची भारतीय युवक काँग्रेसच्या आमगाव तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. दिपक देशकर यांच्यासोबत प्रदीप नागपुरे, शैलेश पटले, रोहित दोनोडे, धिरज ठाकरे, सचिन तोरणकर, नरेश रक्षे, निगम सोनवणे आणि प्रशांत बगाडे यांनीही काँग्रेस पक्षात प्रवेश केला. या प्रवेशामुळे आमगाव तालुक्यात युवक काँग्रेसच्या संघटनात्मक कार्याला बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. या कार्यक्रमाला खासदार डॉ. नामदेव किरसान, आमगाव तालुका काँग्रेस अध्यक्ष संजय बहेकर, रामसिंग चव्हाण, इसुलालजी भालेकर, दुष्यंत किरसान, शहर अध्यक्ष देवकांत बाहेकर, महेश उके, बाबा मिश्रा, दिलीप टेंभरे, यादवराव भोयर, राहुल चुटे, पिंकेश शेंडे आणि अभय ढेंगे आदी मान्यवर उपस्थित होते.

दिपक देशकर यांच्यावर सोपविण्यात आलेल्या नव्या जबाबदारीमुळे युवक काँग्रेसच्या संघटनात्मक कार्याला गती मिळण्याची शक्यता आहे. युवकांचे प्रश्न प्रभावीपणे मांडणे, युवकांना संघटित करणे आणि काँग्रेस पक्षाची विचारधारा जनसामान्यांपर्यंत पोहोचविणे यासाठी सक्रियपणे कार्य करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. दिपक देशकर यांच्या नियुक्तीबद्दल उपस्थित मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

प्रार्थनेप्रमाणे आचार हीईल जीवनाचा उद्धार : शिवलिंग पटवे



दै. सिंहवाणी वृत्त, श्रीरामपूर

वंदनीय राष्ट्रसंतांनी सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थना समाजापुढे व्यापक हेाण्याकरिता ठेवली यातील प्रत्येक शब्द अनमोल आहे जो जो साधक प्रार्थनेचा आशय आपल्या जीवनात आणील त्याला दुसरे शास्त्र पाहण्याची गरज नाही यानेच त्यांचा उद्धार होऊ शकतो मात्र त्यांनी या प्रार्थनेच्या अर्थाकडे लक्ष देऊन तसाच आपला आचार बनवण्याची काळजी घेतली पाहिजे असे प्रतिपादन शिवलिंग अण्णा पटवे यांनी सामुदायिक प्रार्थनेत केले.

श्री गुरुदेव सेवा मंडळ श्रीरामपूर वतीने पुसद तालुक्यात विविध ठिकाणी ५१ सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थना व भजन संध्या उपक्रमास उस्फुर्त प्रतिसाद मिळत असून यावेळी अनिता सूर्यवंशी यांच्या निवासस्थानी सामुदायिक प्रार्थना व भजन संध्या घेण्यात आली यावेळी तालुका सेवाधिकारी शिवशंकर नागरे,नारायण सूर्यवंशी, सुभाष पवार, मोहन नागपूरकर,गजानन चव्हाण,जितेंद्र किन्हेकर भीमराव वानखडे मंडळाचे अध्यक्ष गणेश धर्माळे प्रामुख्याने उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते अधिष्ठान पूजन करून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. स्मिता धर्माळे यांच्या आदेशावरून शिस्तबद्ध सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली यावेळी प्रार्थनेच्या महत्त्वावर बोलतांना पटवे पुढे म्हणाले की आपल्याला पूर्व पुण्याईने सत्संग लाभला आपण सर्व दुःख विसरून प्रार्थनेमुळे आनंदित होतो कारण प्रार्थना दुःखाच्या गर्तेतून काढून आनंदाच्या अनुभवाकडे नेते, समाजातील अनिष्ट प्रथांचे उच्चाटन व इष्ट प्रथांची स्थापना करीत वर्तमान काळात मानव धर्माला उजाळा दिला जातो यावेळी त्यांनी अनेक संत महापुरुष यांची उदाहरणे दिली.

यानंतर भजनांचा बहारदार कार्यक्रम संपन्न झाला हार्मोनियम अशोक भगत महाराज, किसन गरडे यशवंत भगत,तबला अनिल अस्वार,किशोर राऊत खंजिरी प्रा. आकाश तावडे महाराज,सुरेश कदम यांनी तर साथसंगत पुंडलिक भालेराव,पंजाब गडदे, श्यामराव देशमाने, कैलास मस्के, देवेश किन्हेकर, सुभाष जाधव, गजानन गव्हाणकर, सूरज केळकर, श्यामराव देशमाने, साहेबराव सरकटे, आदित्य कापसे,महिला प्रतिनिधी कमल गडदे,मुक्ता काळबांडे,संध्या पवार,मंगला कापसे,डॉ.देवश्री काळबांडे, रंजना किन्हेकर संगीता उतळे,त्रिशा कापसे, सुभद्राबाई गांजेवार,ऐश्वर्या सूर्यवंशी यांनी केली. अल्पोपहार, महाआरती, राष्ट्रवंदना, जयघोषाने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी असंख्य स्त्री पुरूष आबालवृद्ध मोठया संख्येने उपस्थित होते.

नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम आज

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम उद्या, रविवार, दि. २५ ऑक्टोबर २०२६ रोजी महाल येथील गडकरी वाडा येथे आयोजित करण्यात आला आहे. महालातील गडकरी वाडा येथे मा. मंत्री महोदय यांच्या जनसंपर्क कार्यालयात सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत हा कार्यक्रम होईल. या वेळेत मंत्री महोदय नागरिकांची निवेदने स्वीकारतील. मा. मंत्री महोदय नागरिकांना व्यक्तिशः भेटतील आणि त्यांच्याशी संवाद साधतील. नागरिकांनी आपल्या समस्या, अडचणी, मागण्या लेखी स्वरुपातच (आवश्यक कागदपत्रे जोडून) आणाव्यात. तसेच आपली लेखी निवेदने मा. मंत्री महोदयांना द्यावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. त्यानंतर दुपारी १ ते २ या कालावधीत नितीन गडकरी आपल्या जनसंपर्क कार्यालयात भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना भेटतील.

पत्रकारांना धमकावणाऱ्यांवर कठोर कारवाई होणार : मुख्यमंत्री

पत्रकारांवरील हल्ले, बदनामी आणि पत्रकारितेच्या कामात अडथळे आणणाऱ्यांविरोधात कठोर भूमिका, दोषी पोलीस अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी

दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा

राज्यात पत्रकारांना धमकावणे, त्यांच्यावर मारहाण करणे, बदनामी करणे तसेच पत्रकारितेच्या कामात अडथळे निर्माण करण्याच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कठोर भूमिका घेतली आहे. पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून, समाजातील अन्याय, भ्रष्टाचार आणि जनसामान्यांच्या समस्या उजेडात आणण्यात त्यांची महत्त्वाची भूमिका असते. त्यामुळे पत्रकारांना धमकावण्याच्या घटनांकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. पत्रकारांची सुरक्षा आणि त्यांच्याशी संबंधित घटनांवर तातडीने कारवाई करण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे. पत्रकारांना धमकावणाऱ्या किंवा त्यांच्या कामात अडथळे निर्माण करणाऱ्यांविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

पत्रकारांना तातडीने संरक्षण देण्याची मागणी

भंडारा जिल्ह्यातील व्हॉइस ऑफ मीडिया संघटनेचे जिल्हाध्यक्ष शशिकांत भोयर यांनी पत्रकारांवरील हल्ले, धमक्या आणि दबावाच्या घटनांमध्ये पोलीस प्रशासनाने निष्पक्षपणे व तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. पत्रकारांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी आणि कर्तव्यात कसूर आढळल्यास नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

पत्रकारांच्या सुरक्षेसाठी महत्त्वाच्या मागण्या

पत्रकारांना धमकावणाऱ्या आणि त्यांच्यावर हल्ले करणाऱ्यांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करावी. पत्रकारांशी संबंधित प्रकरणांची जलद आणि निष्पक्ष चौकशी करावी. पत्रकार संरक्षण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. पत्रकारांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात. पत्रकारांच्या तक्रारींवर निर्धारित वेळेत कारवाई सुनिश्चित करावी.

तक्रारींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांची जबाबदारी



निश्चित करून नियमानुसार कारवाई करावी.

शशिकांत भोयर म्हणाले की, पत्रकारांना धमकी देणे म्हणजे केवळ एका व्यक्तीला घाबरवणे नव्हे, तर स्वतंत्र पत्रकारितेला कमकुवत करण्याचा प्रयत्न आहे. पत्रकार जनतेच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात. त्यामुळे त्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे ही शासन आणि प्रशासनाची जबाबदारी आहे.

राजकीय किंवा सामाजिक प्रभावाचा वापर करून पत्रकारांवर दबाव आणणाऱ्यांना पाठीशी घालू नये. अशा प्रकरणांची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कायद्यानुसार कारवाई करावी, जेणेकरून पत्रकार निर्भयपणे आपले कर्तव्य पार पाडू शकतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पत्रकारांची सुरक्षा म्हणजे लोकशाहीचे संरक्षण

पत्रकारांना धमकावणे, त्यांच्यावर हल्ले करणे आणि त्यांच्या कामात अडथळे निर्माण करणे अशा घटनांवर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी शासन, पोलीस प्रशासन आणि संबंधित विभागांमध्ये समन्वय असणे आवश्यक आहे. पत्रकार संघटनांनी पत्रकार संरक्षण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करून पत्रकारांना वेळेत न्याय मिळावा, अशी मागणी केली आहे.

पत्रकारांना निर्भयपणे काम करता आले, तरच जनतेचा आवाज अधिक प्रभावीपणे प्रशासनापर्यंत पोहोचू शकतो. त्यामुळे पत्रकारांची सुरक्षा ही केवळ पत्रकारांची नव्हे, तर संपूर्ण लोकशाही व्यवस्थेची गरज आहे.

मेरा युवा भारत, चंद्रपूरतर्फे युवा पडोस संसद अंतर्गत 'नशामुक्त अभियान' कार्यक्रम संपन्न



दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा-धर्मेंद्र शेरकुरे

भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयांतर्गत कार्यरत मेरा युवा भारत, चंद्रपूर यांच्या वतीने युवा पडोस संसद कार्यक्रमांतर्गत 'नशामुक्त अभियान' हा जनजागृतीपर कार्यक्रम २४ ऑक्टोबर २०२६ रोजी आनंद निकेतन महाविद्यालय, आनंदवन येथे राष्ट्रीय सेवा योजनाच्या माध्यमातून आयोजित करण्यात आला. युवकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करणे, व्यसनांचे दुष्परिणाम समजावून सांगणे आणि सक्षम, निरोगी व जबाबदार युवा पिढी घडविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मृणाल काळे, प्रमुख पाहुणे तथा व्यक्ते म्हणून मोक्षदा नाईक, नीरज आत्राम, तिलक ढोबळे, धनश्री पंचभाई, रुपेश कुतरमारे आणि सुरेश राठोड उपस्थित होते. मान्यवरांनी युवकांनी व्यसनांपासून दूर राहून शिक्षण, सामाजिक कार्य आणि राष्ट्रनिर्मितीमध्ये सक्रिय योगदान द्यावे, असे आवाहन केले. मेरा युवा भारत, चंद्रपूर यांच्या माध्यमातून आयोजित या उपक्रमात युवकांचा सामाजिक सहभाग वाढविणे आणि व्यसनमुक्त भारताच्या संकल्पनेला बळकटी देण्यावर विशेष भर देण्यात आला. युवा पडोस संसद या उपक्रमाच्या माध्यमातून युवकांना सामाजिक प्रश्नांवर विचार मांडण्यासाठी, जनजागृती करण्यासाठी आणि समाजाप्रती आपली जबाबदारी ओळखण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे यूथ सोशलग्राम फाउंडेशनच्या महाराष्ट्र राज्य समितीतर्फे आयोजित नशामुक्त दिवाळी पोस्टर प्रदर्शन. या प्रदर्शनातून दिवाळीचा सण व्यसनमुक्त, सुरक्षित आणि आनंददायी पद्धतीने साजरा करण्याचा संदेश देण्यात आला. युवकांनी व्यसनांपासून दूर राहून आपल्या कुटुंबात आणि समाजात व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचवावा, असे आवाहन या उपक्रमातून करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सायली बलकी हिने केले, तर आभार प्रदर्शन स्वरांजली चौधरी हिने केले. मेरा युवा भारत, चंद्रपूर यांच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या या जनजागृतीपर उपक्रमामुळे युवकांमध्ये सामाजिक जबाबदारी, आरोग्यविषयक जागरूकता आणि व्यसनमुक्त समाजनिर्मितीचा संदेश पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला, कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

सद्भावना कॉलनीजवळील धोकादायक स्पीड ब्रेकर ठरतोय 'ब्लॅक स्पॉट', दोन वाहनांचे नुकसान

सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांची स्पीड ब्रेकर हटवून योग्य पद्धतीने बसविण्याची मागणी

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

पोलीस स्टेशन सावनेरच्या हद्दीतील सदभावना कॉलनीजवळ सुरू असलेल्या रस्ते बांधकामामुळे वाहनांसाठी बाजूला सर्व्हिस रोड तयार करण्यात आला आहे. मात्र, या सर्व्हिस रोडवर बसविण्यात आलेले सिमेंटचे स्पीड ब्रेकर वाहनचालकांसाठी धोकादायक ठरत असल्याचे समोर आले आहे. या स्पीड ब्रेकरमुळे वाहनांचे नुकसान होत असून, संबंधित ठिकाण अपघातप्रवण क्षेत्र अर्थात ब्लॅक स्पॉट ठरण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २३ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ६.३० वाजता आणि रात्री ११.३० वाजताच्या



सुमारास अशा दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये वाहनांचे नुकसान झाले. नागपूरच्या दिशेने जाणाऱ्या एमएच ४९ सीएल १२०५ आणि एमएच ३१ एफआर ११६१ या क्रमांकाच्या वाहनांना या स्पीड ब्रेकरमुळे नुकसान झाल्याचे समजते.

वाहनांचा वेग नियंत्रित ठेवण्यासाठी स्पीड ब्रेकर बसविण्याचा उद्देश निश्चितच योग्य आहे. मात्र, स्पीड ब्रेकरची उंची, रचना आणि बसविण्याची पद्धत योग्य नसेल, तर तेच वाहनचालकांसाठी धोक्याचे कारण ठरू शकतात. संबंधित ठिकाणी स्पीड ब्रेकरमुळे वाहनांचे नुकसान होत असल्याने वाहनचालकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. भविष्यात मोठा अपघात होण्यापूर्वी या समस्येवर तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे.

सद्भावना कॉलनीजवळील सर्व्हिस रोडवरील धोकादायक सिमेंटचे स्पीड ब्रेकर तातडीने हटवून, नियमांनुसार आणि योग्य मापदंडांचा वापर करून सुरक्षित स्पीड ब्रेकर बसविण्यात यावेत. तसेच, संबंधित यंत्रणेने या ठिकाणाची पाहणी करून वाहनचालकांची सुरक्षितता सुनिश्चित करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मृत्युंजय दूत रुग्णसेवक हितेश बनसोड यांनी केली आहे.वेळीच उपाययोजना करा, वाहनचालकांचे नुकसान आणि संभाव्य अपघात टाळा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

सोमवारपासून अमरावती-उधना विशेष रेल्वे

अमरावती: आगामी दिवाळी सणादरम्यान वाढणारी प्रवाशांची गर्दी हाताळण्यासाठी मध्य रेल्वे अमरावती आणि उधना दरम्यान विशेष गाड्या चालवणार आहे. सणाच्या काळात वाढीव प्रवासी वाहतूक सुरळीतपणे सुरू ठेवण्यासाठी या विशेष गाड्या सोडण्यात येणार आहेत. या गाडीमुळे विदर्भातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. प्रवाशांची वाढती गरज लक्षात घेता अमरावती ते उधना दरम्यान थेट रेल्वेसेवा सुरू करण्याची मागणी गेल्या अनेक दिवसांपासून करण्यात येत होती.गाडी क्रमांक ०९०१४ साप्ताहिक विशेष गाडी २६.१०.२०२६ ते ३०.११.२०२६ पर्यंत दर सोमवारी अमरावतीहून रात्री २३:३० वाजता सुटेल आणि पुढच्या मंगळवारी सकाळी ०९:३५ वाजता उधना येथे पोहोचेल. गाडी क्रमांक ०९०१३ साप्ताहिक विशेष गाडी २६.१०.२०२६ ते ३०.११.२०२६ पर्यंत दर सोमवारी उधना येथून सकाळी ११:३० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी रात्री २१:२० वाजता अमरावतीला पोहोचेल.

नासिर ढाब्याजवळ दोन दुचाकींची धडक, तिघे जखमी

हितेश बनसोड यांची तत्परता, महामार्ग पोलीस घटनास्थळी दाखल, जखमींना तातडीने रुग्णालयात हलविले



दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

पोलीस स्टेशन सावनेरच्या हद्दीतील हेटी परिसरात नासिर ढाब्याजवळ शुक्रवारी रात्री सुमारे १०.३० वाजता दोन दुचाकींची धडक होऊन तिघे जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले. दरम्यान, महामार्ग पोलिसही तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. हितज्योती आधार फाउंडेशनच्या रुग्णवाहिकेतून जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगसा येथील हिरालाल उईके (वय ५०) हे भगिमहारी येथील शेतातून मोटारसायकल क्रमांक एमएच ४० डीएम ७४३५ ने घरी परतत होते. दरम्यान, नासिर ढाब्याजवळ समोरून येणाऱ्या दुसऱ्या दुचाकीशी त्यांच्या वाहनाची धडक झाली. या अपघातात हिरालाल उईके यांच्या हाताला दुखापत झाली, तर त्यांच्यासोबत असलेले साहिल हिरालाल उईके (वय १९) हेदेखील जखमी झाले. दुसऱ्या दुचाकीवरील हेटी येथील किशोर जगदीश पोगडे (वय ३०) यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली. त्यांना पुढील उपचारासाठी नागपूर येथील मेयो रुग्णालयात हलविण्यात आले.

अपघाताची माहिती मिळताच हितेश बनसोड यांनी महामार्ग सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत कोळी यांना कळविले. त्यानंतर महामार्ग पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन परिस्थितीची पाहणी केली. अपघातानंतर रस्त्यावर पडलेल्या दुचाकी बाजूला करून वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये, बाजूला केल्यात अपघातामुळे परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, महामार्ग पोलिसांची तत्परता आणि हितेश बनसोड यांनी केलेल्या मदतकार्यामुळे जखमींना तातडीने वैद्यकीय उपचारांसाठी हलविण्यात आले.

राईस उद्योगाच्या समस्या सोडविण्यासाठी सदैव तत्पर : खासदार राजेंद्र जैन

धान उत्पादक शेतकऱ्यांच्या हितांचे रक्षण आणि राईस मिलिंग उद्योगाच्या विकासासाठी शासनस्तरावर सातत्याने प्रयत्न करणार

दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया

गोंदिया-भंडारा जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांच्या हितांचे रक्षण करण्यासोबतच राईस मिलिंग उद्योगाच्या विविध समस्या सोडविण्यासाठी शासनस्तरावर सातत्याने प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही खासदार राजेंद्र जैन यांनी दिली. गोंदिया येथील घाट रोडवरील स्वागत लॉन, पार्किंग ग्राउंड येथे आयोजित तांदूळ व डाळ उद्योगांच्या यंत्रसामग्री प्रदर्शनादरम्यान ते बोलत होते.

राईस मिलिंग उद्योगाचे अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान

गोंदिया आणि भंडारा हे दोन्ही जिल्हे धान उत्पादनासाठी प्रसिद्ध आहेत. या भागात मोठ्या प्रमाणावर धानाचे उत्पादन होत असल्याने राईस मिलिंग



उद्योगाचा मोठ्या प्रमाणात विस्तार झाला आहे. या उद्योगामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यासोबतच रोजगाराच्या संधीही उपलब्ध होत आहेत.

धान उत्पादक शेतकऱ्यांचे हित जपण्याबरोबरच राईस उद्योगाची प्रगती आणि उन्नती साधण्यासाठी खासदार प्रफुल्ल पटेल यांनी नेहमीच प्रयत्न केले आहेत, असे खासदार राजेंद्र जैन यांनी नमूद केले.

राईस मिलर्सच्या समस्या सोडवून या उद्योगाला प्रोत्साहन दिल्यास परिसरात रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील. तसेच स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळून कृषीआधारित उद्योगांच्या विकासाला चालना मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

शेतकरी आणि राईस मिलर्सच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील

धान उत्पादक शेतकरी आणि राईस मिलर्स यांच्या समस्यांची गांभीर्याने दखल घेऊन त्यांचे निराकरण करण्यासाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केला जाईल, असे आश्वासन खासदार राजेंद्र जैन यांनी दिले. गोंदिया-भंडारा जिल्ह्यातील कृषीआधारित उद्योगांची प्रगती आणि विकास साधण्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रमाला आमदार राजकुमार बडोले, आमदार विनोद अग्रवाल, माजी आमदार गोपाल अग्रवाल यांच्यासह सुनीलभाऊ फुंडे, केशव मानकर, अशोक अग्रवाल, रवि अग्रवाल, नरेश माहेश्वरी, कैलाश अग्रवाल, गोपाल एच. अग्रवाल, आकाश अग्रवाल, राहुल अग्रवाल, राजेश अग्रवाल, सचिन गहाणे, सुरेशबाबू असाटी यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

थोडक्यात

उखर्डा येथे सर्पदंशाने बैलाचा मृत्यू, शेतकऱ्याला तात्काळ भरीव मदत द्या : अभिजित कुडे

दुष्काळाच्या संकटात सर्पदंशाने बैल दगावल्याने शेतकरी उघड्यावर, प्रशासनाने तातडीने पंचनामा करून भरपाई देण्याची मागणी



दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा - धर्मेंद्र शेरकुरे

आधीच निसर्गाची अवकृपा व नापिकीमुळे तसेच दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी कमालीचा हवालदिल झालेला असताना, उखर्डा येथे एका अत्यंत दुर्दैवी घटनेत सर्पदंशाने बैलाचा मृत्यू झाला आहे. ही घटना दि २३ ऑक्टोंबर रोजी दुपारी ३ वाजता घडली, लाडका सर्जा राजा मरण पावल्या मुळे गोपाल रघुनाथ डोमकावळे राहणार उखर्डा ता वरोरा यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, संबंधित कृषी विभाग व महसूल प्रशासनाने पशुसंवर्धन अधिकारी यांच्या मार्फत पंचनामा करून आर्थिक मदत करावी, पिडीत शेतकऱ्यांचे एका लाखाचे नुकसान झाले आहे, तात्काळ आर्थिक मदत करावी अशी मागणी शेतकरी डोमकावळे यांनी केली आहे. संबंधित शेतकऱ्याची कंबर मोडली आहे. या गंभीर घटनेची तातडीने दखल घेऊन प्रशासनाने सर्व कागदोपत्री सोपस्कार त्वरित पूर्ण करावेत आणि पीडित शेतकऱ्याला तात्काळ भरीव आर्थिक मदत द्यावी, अशी आक्रमक मागणी सामाजिक कार्यकर्ते अभिजित कुडे यांनी केली आहे.

शेतकरी गोपाल डोमकावळे यांनी आपला बैल नेहमीप्रमाणे शेतात बांधून ठेवला होता. दुपारी ३ च्या सुमारास अचानक विषारी सापाने बैलाला दंश केला. विष अंगात भिनल्यामुळे काही वेळातच बैलाचा तडफडून मृत्यू झाला.

"सध्या शेतकरी दुष्काळ, नापिकी आणि कर्जाच्या बाजारात होरपळून निघत आहे. अशा परिस्थितीत शेतात राबणारा आणि शेतकऱ्याचा खरा सखा असणारा बैल अचानक सर्पदंशाने दगावणे म्हणजे त्या कुटुंबाची कंबर मोडण्यासारखे आहे. एका बैलाची किंमत आजच्या काळात लाखो रुपयांच्या घरात आहे. शेतीची कामे कशी करायची, हा यक्षप्रश्न आता गोपाल डोमकावळे यांच्यासमोर उभा राहिला आहे."

रामटेक रेल्वे स्थानकावर अधिकाऱ्यांचा जनसंवाद

गाड्यांच्या विलंबामुळे प्रवासी त्रस्त, दुपारची रेल्वे बंद केल्याने नाराजी



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

रामटेक रेल्वे स्थानकावर २२ ऑक्टोबर रोजी रेल्वे अधिकाऱ्यांच्या वतीने जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. वायव्वी सीनियर डीएम साकिद आणि वाणिज्यिक निरीक्षक कविता नरेंद्र सिंह यांनी प्रवाशांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. याप्रसंगी स्थानक परिसरात स्वच्छता मोहीमही राबविण्यात आली. जनसंवादादरम्यान प्रवाशांनी रेल्वेगाड्यांच्या सततच्या विलंबाबाबत तसेच दुपारची रेल्वे बंद केल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. सकाळी आणि सायंकाळी धावणाऱ्या रेल्वेगाड्या महिन्यातील जवळपास २० दिवस उशिराने धावत असल्याची तक्रार प्रवाशांनी केली. त्यामुळे नोकरी, व्यवसाय, शिक्षण तसेच अन्य कामांसाठी जाणाऱ्या प्रवाशांना वेळेवर इच्छित स्थळी पोहोचता येत नाही. रेल्वेगाड्यांच्या अनियमित वेळापत्रकामुळे त्रस्त झालेल्या अनेक प्रवाशांनी रेल्वेने प्रवास करणेही बंद केल्याचे सांगितले. रामटेक तालुक्यातील नागरिकांसाठी रेल्वे ही दळणवळणाची महत्त्वाची जीवनवाहिनी आहे. मात्र, गाड्यांच्या विलंबामुळे प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

दुपारची रेल्वे बंद केल्यामुळे प्रवाशांच्या अडचणींमध्ये आणखी भर पडल्याचे वायेळी सांगण्यात आले. कन्हान टर्मिनलवर रामटेक लोकल थांबवून ठेवली जात असल्याचा मुद्दाही प्रवाशांनी उपस्थित केला. डुमरी ते कन्हानदरम्यान दुहेरी रेल्वेमार्ग उभारण्याची मागणी त्यांनी केली. डुमरी रेल्वे स्थानकावरील कोळसा डेपोमुळे रामटेक लोकलला थांबवून ठेवले जात असल्याने प्रवाशांचा वेळ वाया जात असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रवाशांनी मांडलेल्या समस्यांची वरिष्ठ रेल्वे अधिकाऱ्यांना माहिती देण्यात येईल, असे आश्वासन रेल्वे अधिकाऱ्यांनी दिले. वायेळी शीतलवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंच जयश्री मडावी, सदस्य कुंदा चौधरी, स्टेशन मास्टर नरेंद्र ईशापुरे, लक्ष्मीनारायण, दिनेश गान, प्रवीण भादे, आशुतोष कोसे यांच्यासह ज्येष्ठ नागरिक आणि प्रवासी उपस्थित होते.

चांदीचे भाव २ लाखांच्या खाली

नागपूर : चांदीच्या दरात २०२६ मध्ये मोठी घसरण झाली असून, यंदा प्रथमच किलोमागे भाव २ लाख रुपयांच्या खाली आला आहे. जानेवारीमध्ये सुमारे ४ लाख ११ हजार रुपये असलेली चांदी आता सुमारे १ लाख ९९ हजार रुपयांवर आली आहे. जागतिक आर्थिक परिस्थिती, मंदीची शक्यता आणि औद्योगिक मागणीतील संभाव्य घट यामुळे चांदीच्या बाजारात मोठी उलथापालथ सुरू आहे. ही घसरण ग्राहकांसाठी खरेदीची संधी ठरणार की दरांतील चढ-उतार कायम राहणार, याकडे सराफा व्यावसायिकांचे लक्ष लागले आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात महागाई आणि आर्थिक मंदीच्या शक्यतेमुळे दबाव निर्माण झाला आहे. त्याचा परिणाम उद्योगक्षेत्रावरही होत आहे. चांदीचा वापर औद्योगिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात होत असला, तरी मागणीत काही प्रमाणात घट झाल्याचे चित्र आहे. या परिस्थितीमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात चांदीच्या किमती घसरत असल्याची माहिती आहे.

शासकीय योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा : अतुल सावे

महात्मा फुले यांच्या द्विजन्मशताब्दीनिमित्त २ दिवसीय प्रशिक्षण शिबिराला प्रारंभ



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून त्यांचा लाभ समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करावे. प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता राखून योजनांची अंमलबजावणी अधिक परिणामकारक करण्यावर भर द्यावा, असे प्रतिपादन इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण विभागाचे मंत्री तथा वनार्टीचे अध्यक्ष अतुल सावे यांनी केले.

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विजन्मशताब्दी वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभाग, पुणे आणि स्व. वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय निवासी प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. पुणे येथील यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) येथे २४ व २५ ऑक्टोबरदरम्यान हे दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. वायेळी छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजे उमाजी नाईक आणि वसंतराव नाईक यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाला भटके-विमुक्त विकास परिषद, महाराष्ट्राचे अध्यक्ष मा. उद्धवराव काळे, इतर मागास व बहुजन कल्याण विभागाचे सचिव आप्पासो धुळाज, वनार्टीचे व्यवस्थापकीय संचालक प्रशांत वावरे, राज्यस्तरीय अशासकीय सदस्य राजेंद्र दोनाडकर, डॉ. संजय पुरी, नरेश पोटे आणि शरद माकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना अतुल सावे म्हणाले की, शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय असणे आवश्यक आहे. प्रशासकीय नियम व कार्यपद्धतींचे पालन करताना क्षेत्रीय स्तरावरील कामकाज अधिक सक्षम आणि परिणामकारक करण्यावर भर दिला पाहिजे. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून विभागाच्या योजनांची अंमलबजावणी अधिक सुसूत्रपणे करण्यास मदत होईल. या शिबिरामध्ये इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे अशासकीय सदस्य, विभागाचे क्षेत्रीय अधिकारी आणि महसूल विभागाचे क्षेत्रीय अधिकारी सहभागी झाले आहेत.

विभागाच्या विविध योजना, शासकीय नियम व कार्यपद्धती, प्रशासकीय जबाबदाऱ्या, योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि क्षेत्रीय स्तरावरील समन्वय या विषयांवर प्रशिक्षणादरम्यान मार्गदर्शन करण्यात येणार आहे. महात्मा फुले यांच्या समताधिष्ठित विचारांना अभिप्रेत असलेल्या सामाजिक परिवर्तनाच्या ध्येयाशी सुसंगतपणे बहुजन समाजाच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांना अधिक गती देणे, हा या प्रशिक्षण शिबिराचा प्रमुख उद्देश आहे.

या शिबिराचे आयोजन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे संचालनालय, पुणे आणि स्व. वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले असल्याची माहिती वनार्टीचे व्यवस्थापकीय संचालक प्रशांत वावरे यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली.

अग्रवाल विज्ञान महाविद्यालयाच्या कबड्डी टीमचे दैदीप्यमान यश

दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा : प्रताप मेमोरियल चॅरिटेबल ट्रस्ट गोंदिया द्वारा संचलित शंकरलाल अग्रवाल विज्ञान महाविद्यालय सालेकसा येथील मुलींच्या कबड्डी संघाने झोनल कबड्डी सामन्यांमध्ये घवघवीत यश संपादन करून महाविद्यालयाचे नाव उज्वल केले. नटवरलाल माणिक लाल दलाल महाविद्यालय गोंदिया येथे घेण्यात आलेल्या अंतर महाविद्यालयीन झोनल कबड्डी सामन्या अंतर्गत महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने अंतिम सामन्यात एस एस जयस्वाल महाविद्यालय मोरगाव अर्जुनी या संघाला ३१-६ गुणांनी पराभूत केले व अंतिम सामन्यात विजय मिळवला या संघामध्ये कु.आशा सोमवंशी, कु. प्रणवी प्रधान, कु. दामिनी बावनथडे, कु. रोशनी उके, कु. संजना चंद्रिकापुरे, कु. त्रिशा भोसकर, कु. वंदना तुमराची, कु. किरण मसे, कु. करीना रहांगडाले, कु. कल्याणी वडगाये, कु. चितल लटाये, कु. प्रिया भोयर या विद्यार्थिनींचा समावेश होता.



या मिळालेल्या यशामागे विद्यार्थिनींनी केलेले कठोर परिश्रम आणि त्यांचे प्रशिक्षक गोल्डी भाटिया व डॉ. संजय बिरनवार यांनी प्राचार्य डॉ एस नारायण मूर्ती यांच्या मार्गदर्शनाखाली घेतलेली मेहनत अत्यंत महत्त्वाची मानली जाते. महाविद्यालयाच्या संघाला मिळालेल्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष विशालजी अग्रवाल सचिव प्रफुलजी अग्रवाल महाविद्यालयाचे प्राचार्य सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक व अभिनंदन केले.

ऊषाकिरण आत्राम यांचा अहेर कथासंग्रह इंग्लिशमध्ये अनुवादित

दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा : कचारगड येथील जेष्ठ साहित्यकार ऊषाकिरण आत्राम तारम यांचा मराठीतल्या अहेर कथासंग्रहाचे इंग्लिशमध्ये अनुवाद केलेले पुस्तक नुकतेच त्यांना मिळाले. या कथासंग्रहातील बाजा,भुक अहेर या गाजलेल्या कथा अनेक विध्यापिठातील अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत. यातील कथा गोंडी, मराठी, हिन्दी,बंगाली मध्येही अनुवाद झालेल्या आहेत आणि आता इंग्लिश मध्ये अनुवाद डॉ. रेणुका रॉय सेठ केशरीमल पोरवाल कॉलेज कामठी, नागपूर विध्यापिठ यांनी केलेला आहे.



यापूर्वी लेखणीच्या तलवारी काव्यसंग्रहाचे इंग्लिश अनुवाद सुध्दा रेणुका यांनी केलेला आहे. ऊषाकिरण आत्रामचे मोट्यारिन, लेखणीच्या तलवारी काव्यसंग्रह इंग्लिश व हिंदीतून अनुवाद झालेले आहे, तसेच लवकरच अहेर कथासंग्रह हिन्दीतून प्रकाशित होण्याच्या वाटेवर असून शब्दशस्त्र काव्यसंग्रहाचे इंग्लिश अनुवाद करण्याचे काम सुरू आहे. त्यांच्या या यशाबद्दल अनेक साहित्यकार मित्रांनी त्यांना शुभेच्छा देऊन अभिनंदन केलेले आहे.

आदिवासी विकास विभागाच्या तत्वावधानाखाली काटोल तालुक्यातील पारधी समुदायाचे कुटुंब सर्वेक्षण सुरू

डोंगरगाव व घुबडमेट येथील पारधी बेड्यांचे सर्वेक्षण पूर्ण



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

आदिवासी विकास विभागाच्या अपर आयुक्त आयुषी सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाचे प्रकल्प अधिकारी उमेश काशीद व सहाय्यक प्रकल्प अधिकारी राहुल काकडे यांच्या सहकार्याने समशेर फाउंडेशन नागपूरच्या टीमने शनिवारी काटोल तालुक्यातील डोंगरगाव व घुबडमेट येथील पारधी बेड्यांचे कुटुंब सर्वेक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले.

हे सर्वेक्षण आदिम जनजाती पारधी समुदायासाठी संपूर्ण महाराष्ट्रभर सुरू करण्यात आलेल्या पारधी कुटुंब निहाय सर्वेक्षणाचा भाग आहे. काटोल तालुक्यातील उर्वरित पारधी बेड्यांचे सर्वेक्षणही लवकरच पूर्ण करण्यात येणार आहे.

सर्वेक्षणादरम्यान कुटुंबप्रमुख व सर्व सदस्यांचे आधार कार्ड, जात प्रमाणपत्र, बँक खाते, रेशन कार्ड, पक्के-कच्चे घरकुल व मालकी हक्काचे पट्टे, जन्म प्रमाणपत्र, जीपीएस लोकेशनद्वारे घरकुलाचे मॅपिंग, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना (एमजेपीजेवाय)/आयुष्मान भारत कार्ड, जॉब कार्ड तसेच नोंदणीकृत मोबाईल क्रमांक यांसारख्या आवश्यक माहिती गोळा केल्या जात आहेत.

समशेर फाउंडेशन नागपूरचे अध्यक्ष अनिल पवार यांनी पारधी कुटुंबांना आवाहन केले आहे की, आदिवासी विकास विभाग व समशेर फाउंडेशनचे प्रतिनिधी त्यांच्या घरी आल्यावर उपलब्ध कागदपत्रे अवश्य द्यावीत. कागदपत्रे उपलब्ध नसतील तर प्रामाणिकपणे त्याची माहिती द्यावी. महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक पारधी कुटुंबाने हे सर्वेक्षण पूर्ण करणे अनिवार्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सर्वेक्षणासंदर्भात कोणतीही अडचण किंवा माहिती हवी असल्यास अनिल पवार (अध्यक्ष, समशेर फाउंडेशन नागपूर) यांच्याशी मोबाईल क्रमांक ७८८८२५९२११ वर संपर्क साधता येईल.

सीए परीक्षेत लुभांशू टक्कामोरे यांचे घवघवीत यश, प्रथम प्रयत्नात ३८१ गुणांसह दोन्ही ग्रुप उत्तीर्ण

दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

सप्टेंबर २०२६ मध्ये झालेल्या चार्टर्ड अकाउंटंट (सीए) परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, या परीक्षेत रामटेक येथील लुभांशू टक्कामोरे याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्याने प्रथमच प्रयत्नात दोन्ही ग्रुप उत्तीर्ण होत एकूण ३८१ गुण मिळवून रामटेकच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. त्याच्या या यशामुळे रामटेकच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



लुभांशू याने इंदूर येथील विद्युदया इन्स्टिट्यूटमध्ये सीए परीक्षेचे मार्गदर्शन घेतले. योग्य नियोजन, सातत्यपूर्ण अभ्यास आणि मेहनतीच्या जोरावर त्याने पहिल्याच प्रयत्नात हे यश मिळविले. त्याच्या या यशाबद्दल वडील रिंकू टक्कामोरे, आई शिखा टक्कामोरे, भाऊ तत्त्वेश तसेच रामटेकमधील परिचित आणि हितचिंतकांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

आपल्या यशाबद्दल लुभांशू याने विद्युदया इन्स्टिट्यूटमधील सर्व शिक्षक आणि कर्मचारीवृंदाचे आभार मानले. चार्टर्ड अकाउंटंट झाल्यानंतर देशाच्या अर्थव्यवस्थेच्या विकासात आणि सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या (जीडीपी) वाढीत महत्त्वपूर्ण योगदान देण्याचा आपला मानस असल्याचे त्याने सांगितले. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सीए क्षेत्रातच करिअर घडविण्याचा त्याचा निर्धार असून, पुढील टप्प्यात आर्टिकलशिपसाठी चांगल्या फर्मच्या शोधात तो आहे. लुभांशूच्या या यशामुळे रामटेकमधील विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, त्याच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात उपमुख्य अभियंता आणि अधीक्षक अभियंता यांच्या अन्यायकारक निलंबनाविरोधात संयुक्त कृती समितीची द्वारसभा

दै. सिंहवाणी वृत्त
कोराडी- मिलिंद गाडेकर

कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातील अन्यायकारक निलंबन आदेशाच्या निषेधार्थ तसेच संबंधित निलंबन आदेश त्वरित मागे घेण्याच्या मागणीसाठी आज शनिवार, दिनांक २४ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १२ वाजता कोराडी औष्णिक विद्युत केंद्राच्या ३६६० मेगावॅट प्रवेशद्वाराजवळ संयुक्त कृती समिती, कोराडीच्या वतीने द्वारसभेचे आयोजन करण्यात आले.



या द्वारसभेला उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांना हर्षद खंडारे आणि नवल दामले यांनी मार्गदर्शन केले. वायेळी अन्यायकारक निलंबनाच्या मुद्द्यावर भूमिका मांडण्यात आली. संबंधित निलंबन आदेश त्वरित मागे घेण्यात यावा, अशी मागणी या आंदोलनाच्या माध्यमातून करण्यात आली. या द्वारसभेद्वारे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एकजुटीने आपल्या न्याय्य मागण्यांसाठी पुढे येण्याचे आवाहन करण्यात आले. आज सहकाऱ्यासाठी उभे राहिलो नाही, तर उद्या आपल्या पाठीशी कोण उभे राहणार? या संदेशातून कर्मचारी एकजुटीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

या द्वारसभेत संयुक्त कृती समिती, कोराडी अंतर्गत सहभागी असलेल्या विविध संघटनांचे प्रतिनिधी व अधिकारी-कर्मचारी सहभागी झाले. त्यामध्ये सर्वॉर्डिनेट इंजिनिअर असोसिएशन (म.रा.वि.मं.), कोराडी; ग्रॅज्युएट इंजिनिअर्स असोसिएशन, कोराडी; महाराष्ट्र वीज कामगार महासंघ, कोराडी; महाराष्ट्र राज्य स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन, कोराडी; महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटन, कोराडी; म.रा.वि.मं. कार्यालयीन अधिकारी/कर्मचारी; विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन (नोंदणी क्र. १०२९) तसेच वीज निर्मिती कंत्राटी कामगार संघटना यांचा समावेश होता.

अन्यायकारक निलंबन आदेश मागे घेऊन संबंधित कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा, या प्रमुख मागणीसाठी संयुक्त कृती समितीच्या माध्यमातून अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एकजुटीची भूमिका मांडली. या द्वारसभेमुळे संबंधित प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला.

थोडक्यात

वाडी पोलिसांकडून बँक व घरफोडी टोळीचा पर्दाफाश, एकाला अटक



दै. सिंहवाणी वृत्त, वाडी

वाडी परिसरात घरफोडी, वाहनचोरी तसेच बँक फोडण्याचा प्रयत्न करणाऱ्या टोळीचा वाडी पोलिसांनी पर्दाफाश केला. या प्रकरणात निलेश मुरलीधर बावणे (वय २१, रा. यशोधरानगर, नागपूर) याला अटक करण्यात आली आहे. २ ऑक्टोबर रोजी पहाटे आठवा मैल येथील बँक ऑफ इंडिया शाखेचे कुलूप तोडून चोरीचा प्रयत्न करण्यात आला होता. बँकेतील सीसीटीव्ही फुटेजमध्ये तोंडाला कापड बांधलेले तीन तरुण दिसून आले. या प्रकरणाचा तपास करताना पोलिसांनी नागपूर शहरातील सुमारे ४० ठिकाणांवरील सीसीटीव्ही फुटेज तपासले. गुप्त माहिती आणि यशोधरानगर पोलिसांच्या सहकार्याने आरोपीचा शोध घेण्यात आला.

वाडीतील इंद्रायणी नगर, स्मृती नगर, त्रिलोक नगर, धम्मकीर्ती नगर, दत्तवाडी व आठवा मैल परिसरात घरफोडीचे प्रयत्न सुरू असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते. टोळीवर योग्य कार्यवाही करावी असे नागरिकांनी निवेदन पण देण्यात आले होते वाडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन मगर यांच्या मार्गदर्शनाखाली डी.बी. पथकाने ही कारवाई केली.

प्रत्येक विद्यार्थी निपुण करण्याचा संकल्प, समुद्रपूरमध्ये तालुकास्तरीय कार्यशाळा



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

निपुण लक्ष घडविण्यासाठी वर्धा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी परागजी सोमण (भा.प्र.से.) यांच्या प्रेरणेतून सर्व पर्यवेक्षक यंत्रणेने आपल्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक विद्यार्थी निपुण करण्याकरिता संकल्प केला असून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्ह्यातील सर्व तालुक्यात शिक्षकांना शैक्षणिक सहाय्य व विद्यार्थ्यांसाठी निपुण चाचणी सरावाची आवश्यकता जाणून घेऊन त्यासाठीची पुढील दिशा दिली आहे. त्यानुसार ठीक ठिकाणी तालुक्यात तालुकास्तरीय निपुण कार्यशाळा होत आहे. दिनांक २१ ऑक्टोबर २०२६ रोजी समुद्रपूर पंचायत समिती अंतर्गत सर्व मुख्याध्यापकांची निपुण कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेला जिल्हा निपुण समन्वयक राजेंद्र मस्के यांनी अध्ययन अध्यापन समृद्ध करण्यासाठी मिशन स्वरूपात सर्व केंद्रप्रमुखांनी व वर्गशिक्षकांनी विद्यार्थ्यांची अध्ययन स्तर निश्चिती कशी करावी व शैक्षणिक सहाय्य कसे द्यावे तसेच वर्ग शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांचा निपुण सराव घेऊन व अध्ययनातील अडचणी समजून घेऊन त्याप्रमाणे उपाययोजना करण्यासाठी उपचारात्मक अध्यापन तंत्रे व स्तर निहाय निपुण शैक्षणिक साहित्य वापराबाबत सादरीकरण केले.

याप्रसंगी पंचायत समिती समुद्रपूर येथील गटशिक्षणाधिकारी ललितकुमार बारसागडे, विस्तार अधिकारी (शिक्षण) विनोद पालवे यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेला विस्तार अधिकारी राहुल महाबुधे, समीर वाघमारे तसेच सर्व केंद्रप्रमुख, विषय साधन व्यक्ती, सर्व विशेष शिक्षक व इयत्ता दुसरी ते पाचवीला अध्यापन करणारे सर्व शाळांतील मुख्याध्यापक/शिक्षक कार्यशाळेला उपस्थित होते. कार्यशाळेचे प्रास्ताविक संजय ढोक गटसमन्वयक यांनी केले. या कार्यशाळेकरिता नरेंद्र फरताडे, गजानन साटोणे, श्रीकांत कावटे,कु. अनिता उगे, गजानन वैद्य, संदीप वाघमारे, दिनेश बारई यांनी सहकार्य केले.

आ.करण देवतळे यांची नागपूर येथील ॲग्रो व्हिजन २०२६ कार्यक्रमाला उपस्थिती

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना वरोरा भद्रावती विधानसभा क्षेत्रातील समस्यांचे निवेदन

दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा- धर्मेंद्र शेरकुरे

नागपूर येथे ॲग्रो व्हिजन २०२६ या कार्यक्रमाचे आयोजन समितीची बैठक केंद्रीय रस्ते व वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन



गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली या बैठकीला उपस्थित राज्याचे कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल व इतर पदाधिकारी व अधिकारी उपस्थिती होती. कृषी प्रदर्शनाच्या नियोजन व पूर्वतयारी बाबत झालेल्या चर्चेत आमदार करण देवतळे यांनी सहभाग घेतला तसेच वरोरा भद्रावती विधानसभा मतदारसंघातील विविध महत्त्वपूर्ण समस्या तसेच



प्रश्नाबाबत केंद्रीय मंत्री नामदार नितीन गडकरी यांना निवेदन देण्यात आले. येत्या २७ ते ३० नोव्हेंबर दरम्यान आयोजित होणाऱ्या कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतकरी बांधवांना आधुनिक कृषी तंत्रज्ञान कृषी यांत्रिकीकरण शेतीतील नवनवीन प्रयोग कृषी प्रक्रिया उद्योग तसेच शेतीपूरक व्यवसायांच्या संधींची माहिती शेतकऱ्यांना मिळणार आहे. तसेच वरोरा, भद्रावती तालुक्यातील दुष्काळ निवारणासाठी उपाययोजना, चारा छावण्या, पाणी टंचाई याबाबतही नामदार नितीन गडकरी यांना आमदार करण देवतळे यांनी निवेदन दिले आहे.

मध्यस्थीच्या प्रभावी अंमलबजावणीत न्यायाधीशांची भूमिका महत्त्वाची

न्यायमूर्ती ए. एस. गडकरी यांचे प्रतिपादन, नागपुरात विभागीय मध्यस्थी परिषदेचे यशस्वी आयोजन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

न्यायदान प्रक्रिया अधिक सुलभ, जलद आणि प्रभावी करण्यासाठी मध्यस्थी ही महत्त्वाची प्रक्रिया असून, तिच्या प्रभावी अंमलबजावणीत जिल्हा न्यायव्यवस्थेची भूमिका निर्णायक आहे. न्यायालयांमधील प्रलंबित वादांचे मध्यस्थीच्या माध्यमातून निराकरण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबईचे कार्यकारी अध्यक्ष तथा मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य मध्यस्थी देखरेख समितीचे अध्यक्ष न्यायमूर्ती ए. एस. गडकरी यांनी केले.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई, मुंबई उच्च



न्यायालयाच्या मध्यस्थी देखरेख उपसमिती, नागपूर आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने सिव्हिल लाइन्स येथील वसंतराव देशपांडे सभागृहात विभागीय मध्यस्थी परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेचे उद्घाटन न्यायमूर्ती ए. एस. गडकरी यांच्या हस्ते झाले. यावेळी नागपूर मध्यस्थी देखरेख उपसमितीचे अध्यक्ष न्यायमूर्ती ए. एस. किलोर, सदस्य न्यायमूर्ती ए. एल. पानसरे, मुंबई उच्च न्यायालयाचे मध्यस्थी देखरेख समितीचे संचालक तथा समन्वयक टी. एस. अकाली आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एम. सलमान आझमी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांचे रोपटे देऊन स्वागत करण्यात आले. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या कार्यावर आधारित गीताने परिषदेची सुरुवात झाली. मान्यवरांनी रोपट्यांना पाणी देऊन पर्यावरण संवर्धनाचा संदेशही दिला.

मध्यस्थी प्रक्रियेला प्रोत्साहन देण्याचे आवाहन

उद्घाटनपर भाषणात न्यायमूर्ती ए. एस. गडकरी यांनी भारतातील मध्यस्थी प्रक्रियेचे वाढते महत्त्व अधोरेखित केले. वादांचे निराकरण करण्यासाठी मध्यस्थीचा अधिकाधिक वापर व्हावा, वासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणांनी उपलब्ध निधीचा पुरेपूर उपयोग करून वार्षिक नियोजन करावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच मध्यस्थी प्रक्रियेद्वारे प्रकरणे निकाली काढण्यासाठी न्यायाधीशांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असेही त्यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाच्या मेडिएशन अँड कॉन्सिलिएशन प्रोजेक्ट कमिटीने सुरू केलेल्या 'मेडिएशन फॉर द नेशन ३.०' या उपक्रमाचाही त्यांनी उल्लेख केला. बदलत्या परिस्थितीत मध्यस्थीच्या माध्यमातून वादांचे निराकरण करण्याची गरज वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले.

कौटुंबिक वादांसह विविध प्रकरणांत मध्यस्थी

परिषदेत तज्ज्ञांनी मध्यस्थीचे सध्याचे स्वरूप, भविष्यातील दिशा, कौटुंबिक वादांमधील मध्यस्थी, समुपदेशनाची भूमिका आणि मध्यस्थीकडे प्रकरणे सोपविणाऱ्या न्यायाधीशांची जबाबदारी या विषयांवर मार्गदर्शन केले. न्यायमूर्ती ए. एल. पानसरे, न्यायमूर्ती यू. एस. जोशी-फाळके आणि न्यायमूर्ती नंदेश एस. देशपांडे यांनी मध्यस्थी प्रक्रियेचे महत्त्व स्पष्ट केले.

मध्यस्थीमुळे संबंधित पक्षांना आपली बाजू मांडण्याची, एकमेकांच्या भावना समजून घेण्याची आणि परस्पर संवादातून वाद सोडविण्याची संधी मिळते. त्यामुळे अनावश्यक संघर्ष कमी होऊन परस्पर संबंध टिकविण्यास मदत होते. मध्यस्थीची प्रक्रिया प्रभावी होण्यासाठी योग्य प्रकरणांची निवड, कुशल व निष्पक्ष मध्यस्थ, योग्य समुपदेशन आणि पक्षकारांचा विश्वास महत्त्वाचा असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले.

तसेच मध्यस्थी प्रक्रियेत सहभागी न्यायाधीशांसाठी संवादकौशल्य, पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेणे आणि प्रकरणांचे योग्य मूल्यमापन याबाबत सातत्याने प्रशिक्षण आवश्यक असल्याचे अधोरेखित करण्यात आले. तंत्रज्ञानाच्या मदतीने ऑनलाइन मध्यस्थी शक्य झाल्याने दुर्गम भागातील पक्षकारांनाही या प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

कचारगढ पाणी वापर संस्थेने हिरावला शेतकऱ्यांच्या तोंडाचा घास!

दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा

तालुक्यातील अतिसंवेदनशील, नक्षलग्रस्त तसेच आदिवासी क्षेत्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पिपरिया परिसरातील शेतकऱ्यांना सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या गोंदिया पाटबंधारे विभागाच्या नियंत्रणाखालील पिपरिया जलाशयातील पाणी व्यवस्थापनाची जबाबदारी असलेल्या कचारगड पाणी वापर संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांवरील अन्यायाची परिसीमा गाठल्याचा आरोप होत आहे. सन २००६ पासून स्थापन झालेल्या या संस्थेच्या कारभारावर आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

संस्थेचा सचिव नेहमी दारूच्या नशेत राहून शेतकऱ्यांशी असभ्य पद्धतीने वागतो, ही बाब नेहमीची झाली असल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्याचबरोबर संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष केले जात असल्याने हा प्रकार अत्यंत निंदनीय असल्याची भावना व्यक्त होत आहे.

अलीकडेच पिपरिया जलाशयातील पाणी शेतकऱ्यांच्या शेतांमध्ये सिंचनासाठी सोडण्यात आले होते. शासनाच्या निर्देशानुसार शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत योग्य नियोजनासह पाणी पोहोचविणे, तसेच पाण्यामुळे कोणत्याही शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान होणार नाही, याची नियमित काळजी घेणे ही पाणी वापर संस्थेची जबाबदारी आहे. या बदल्यात शेतकऱ्यांकडून पाणीपट्टी वसूल करण्याचा संस्थेला अधिकार आहे.

मात्र, सर्व नियम धाब्यावर बसवून संस्थेकडून मनमानी कारभार केला जात असल्याचा आरोप असून, हा प्रकार आता शेतकऱ्यांना सहन करणे अशक्य झाले आहे. नुकतेच नवागड (पिपरिया) येथील शेतकरी छगनलाल दमाहे यांच्या शेतातील कापून ठेवलेले धान पाणी वापर संस्थेच्या निष्काळजीपणामुळे पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आहे. सिंचनाचे पाणी शेतात शिरल्याने कापून ठेवलेले धान पाण्यावर तरंगू लागले आणि संपूर्ण पीक कुजून गेले. त्यामुळे शेतकऱ्याचे

नुकसानभरपाईची मागणी, तहसीलदारांना निवेदन सादर

मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे.

या गंभीर प्रकाराची दखल घेऊन शेतकरी छगनलाल दमाहे यांनी सालेकसा येथील तहसीलदारांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करून नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे. तसेच, आपल्या निवेदनाची दखल घेऊन योग्य न्याय न मिळाल्यास एका आठवड्यानंतर कुटुंबीयांसह तहसील कार्यालयाच्या आवारात बेमुदत उपोषण सुरू करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. मागण्या पूर्ण होईपर्यंत उपोषण मागे घेणार नसल्याचे त्यांनी निवेदनातून स्पष्ट केले आहे.

मनपाच्या कृत्रिम जलकुंडात बाराव्या दिवशी २७५ श्री दुर्गा देवी मूर्तींचे विसर्जन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नवरात्री उत्सवाच्या अनुषंगाने शहरात श्री दुर्गा देवीच्या मूर्तींचे आगमन झाल्यानंतर विसर्जन पर्यावरणपूरक पद्धतीने व्हावे, वासाठी नागपूर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील विविध ठिकाणी कृत्रिम तलावांची व्यवस्था करण्यात आली आहे. मोठ्या आकाराच्या मूर्तींच्या विसर्जनासाठी गोरेवाडा रिंग रोड, पोलीस लाईन टाकळी आणि कोराडी येथे विशेष कृत्रिम जलकुंड उभारण्यात आले आहेत. शहरातील विविध कृत्रिम तलाव व जलकुंडांमध्ये गुरुवारी (ता.२२) रोजी भक्तांनी श्री दुर्गा देवींच्या मूर्तींचे पर्यावरणपूरक पद्धतीने विसर्जन केले. बाराव्या दिवशी विविध ठिकाणी एकूण २७५ श्री दुर्गा देवींच्या मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. तीन दिवसता एकूण ९०२ मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. महापौर निता ठाकरे व मनपा आयुक्त डॉ. विपीन यांच्या मार्गदर्शनात घट विसर्जन व मूर्ती विसर्जन व्यवस्था करण्यात आली. महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी या कृत्रिम तलावांमध्ये क्रेनची व्यवस्था करून विसर्जनासाठी मदत केली. लक्ष्मीनगर झोनमध्ये १ कृत्रिम तलाव उभारण्यात आला असून, येथे २२ श्री दुर्गा देवींच्या मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. धंतोली झोनमध्ये १ कृत्रिम तलावाची व्यवस्था करण्यात आली असून, ७ मूर्तींचे विसर्जन झाले. याशिवाय पोलीस लाईन टाकळी येथील कृत्रिम जलकुंडात ७२, गोरेवाडा रिंग रोड जलकुंडात १०९ आणि कोराडी जलकुंडात ६५ श्री दुर्गा देवींच्या मूर्तींचे विसर्जन करण्यात आले.

सिमकॉन मॅनेजमेंट फाउंडेशनतर्फे डॉ. भीमराया मेट्री यांचा सन्मान, शिक्षण आणि उद्योग क्षेत्रातील नेतृत्व, संस्थात्मक विकास व व्यवसाय विस्तारावर विचारमंथन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

सिमकॉन मॅनेजमेंट फाउंडेशनतर्फे भारतीय व्यवस्थापन संस्था, नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मैत्री यांच्या सन्मानार्थ विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात व्यवस्थापन शिक्षण, संस्थांची उभारणी, औद्योगिक विकास, उद्योजकता आणि नेतृत्वाच्या बदलत्या भूमिकेवर विचारमंथन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे 'द इम्प्लेक्शन पॉइंट'या विषयावर डॉ. भीमराया मैत्री आणि उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी विशाल अग्रवाल यांच्यात झालेला संवाद. सिमकॉनचे अध्यक्ष श्रीकांत संपत यांनी या संवादाचे सूत्रसंचालन केले.

कार्यक्रमाची सुरुवात सिमकॉन मॅनेजमेंट फाउंडेशनचे सचिव अमित बाजपेयी यांनी उपस्थित मान्यवरांचा परिचय करून देऊन केली. त्यानंतर प्रशांत गोडबोले यांनी सिमकॉन चार्टरचे वाचन केले. सिमकॉनचे अध्यक्ष श्रीकांत संपत यांनी अध्यक्षीय भाषणात संस्थेची उद्दिष्टे, दूरदृष्टी आणि व्यवस्थापन, नेतृत्व व व्यावसायिक विकासाच्या क्षेत्रात अर्थपूर्ण संवादाला प्रोत्साहन देण्याच्या भूमिकेवर प्रकाश टाकला.

यानंतर सिमकॉनचे उपाध्यक्ष सौरव मोहता यांनी CIMCON'27 आयोजन समितीचा परिचय करून दिला. पुढे रंजीत दानी यांनी डॉ. भीमराया मैत्री यांच्या सन्मानार्थ सादर करण्यात आलेल्या स्क्रोल ऑफ ऑनरचे वाचन केले. त्यानंतर प्रमुख अतिथी विशाल अग्रवाल यांनी सिमकॉन मॅनेजमेंट फाउंडेशनच्या कार्यकारिणी समितीच्या सदस्यांसह डॉ. मैत्री यांचा सत्कार केला. सत्काराला उत्तर देताना डॉ. मैत्री यांनी आयोजकांचे आभार मानले आणि उपस्थितांशी आपले विचार सामायिक केले.

'द इम्प्लेक्शन पॉइंट' : व्यवस्थापन शिक्षण आणि उद्योग क्षेत्रातील अनुभवांचा संगम

कार्यक्रमातील प्रमुख आकर्षण असलेल्या 'द इम्प्लेक्शन पॉइंट'या संवादात डॉ. भीमराया मैत्री आणि विशाल अग्रवाल यांनी शिक्षण व उद्योग क्षेत्रातील अनुभवांच्या आधारे नेतृत्व, संस्थात्मक उभारणी आणि विकासाच्या विविध पैलूंवर चर्चा केली. श्री. श्रीकांत संपत यांनी या संवादाचे सूत्रसंचालन केले. Think – Build – Scale 10X या व्यापक संकल्पनेच्या अनुषंगाने दूरदृष्टीपूर्ण विचार, भक्कम पायाभूत रचना आणि नियोजनबद्ध विस्तार यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

डॉ. भीमराया मैत्री यांनी



व्यवस्थापन शिक्षण आणि भारतीय व्यवस्थापन संस्थांची भूमिका याविषयी आपले विचार मांडले. त्यांच्या मते, एखाद्या शैक्षणिक संस्थेचे यश केवळ पायाभूत सुविधा किंवा शैक्षणिक अभ्यासक्रमांपुरते मर्यादित नसते. संस्थेची स्पष्ट दूरदृष्टी, शैक्षणिक गुणवत्ता, सक्षम नेतृत्व, नवोन्मेषाला प्रोत्साहन देणारी संस्कृती आणि सातत्याने सुधारणा करण्याची वृत्ती या बाबी संस्थेच्या दीर्घकालीन यशासाठी महत्त्वपूर्ण ठरतात.

IIM नागपूरसारख्या संस्थांची भूमिका केवळ कुशल व्यवस्थापक घडविण्यापुरती मर्यादित नसून, गुंतागुंतीच्या व्यावसायिक परिस्थितीत योग्य निर्णय घेणारे, नव्या संधी ओळखणारे आणि समाज व अर्थव्यवस्थेच्या विकासात योगदान देणारे नेतृत्व विकसित करणेही महत्त्वाचे आहे, असे त्यांनी अधोरेखित केले. बदलते तंत्रज्ञान, उद्योगांच्या गरजा आणि जागतिक आर्थिक परिस्थिती यांच्याशी सुसंगत राहण्यासाठी व्यवस्थापन शिक्षणात सातत्याने सुधारणा करणे आवश्यक आहे. शिक्षणसंस्था आणि उद्योग यांच्यातील सहकार्याचे महत्त्व स्पष्ट करताना त्यांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष व्यावसायिक आव्हानांचा अनुभव देणे, संशोधनाला चालना देणे आणि उद्योगाच्या बदलत्या गरजांनुसार विद्यार्थ्यांना तयार करणे आवश्यक असल्याचे नमूद केले. शैक्षणिक संस्था आणि उद्योग यांच्यातील समन्वयामुळे विद्यार्थ्यांची व्यावहारिक समज वाढण्यासोबतच नवोन्मेष आणि नेतृत्व विकासालाही प्रोत्साहन मिळते. दुसरीकडे, विशाल अग्रवाल यांनी उद्योग क्षेत्रातील अनुभवांच्या आधारे व्यवसाय उभारणी, कार्यक्षम व्यवस्थापन आणि व्यवसाय विस्ताराच्या रणनीतींवर प्रकाश टाकला. त्यांच्या मते, व्यवसायाला मोठ्या स्तरावर नेण्यासाठी केवळ विस्ताराची महत्त्वाकांक्षा पुरेशी नसते. त्यासाठी स्पष्ट व्यावसायिक दृष्टिकोन, गुणवत्तेबद्दलची बांधिलकी, ग्राहकांचा विश्वास, नवोन्मेष, सक्षम मनुष्यबळ आणि प्रभावी अंमलबजावणी आवश्यक असते.

बदलत्या बाजारपेठेतील परिस्थिती, ग्राहकांच्या अपेक्षा आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान यांच्याशी जुळवून घेण्याची क्षमता व्यवसायाच्या दीर्घकालीन यशासाठी महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले. व्यवसायाचा विस्तार करताना अंतर्गत कार्यप्रणाली अधिक सक्षम करणे, गुणवत्तेचा दर्जा कायम राखणे आणि नव्या संधींचा योग्य वेळी लाभ घेणे आवश्यक आहे. औद्योगिक विकास हा केवळ व्यावसायिक यशापुरता मर्यादित नसून रोजगारनिर्मिती, उद्योजकतेला प्रोत्साहन आणि प्रादेशिक आर्थिक विकासातही त्याचे महत्त्वपूर्ण योगदान असते, असे त्यांनी स्पष्ट केले.

शिक्षण आणि उद्योग क्षेत्रातील समन्वयातून विकासाला चालना या संवादातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे शैक्षणिक संस्था आणि उद्योग क्षेत्र यांच्यातील परस्परपूरक संबंध. शैक्षणिक संस्था ज्ञान, कौशल्य, संशोधन आणि नव्या कल्पनांना आकार देतात, तर उद्योग क्षेत्र या ज्ञानाचा प्रत्यक्ष वापर करून व्यावसायिक आव्हानांवर उपाय शोधण्याची संधी उपलब्ध करून देते. दोन्ही क्षेत्रांमधील सहकार्यामुळे नवोन्मेष, व्यावहारिक शिक्षण, उद्योजकता आणि नेतृत्व विकासाला चालना मिळू शकते. उद्योगांच्या गरजांनुसार शैक्षणिक कौशल्ये विकसित करणे आणि नव्या पिढीतील प्रतिभेला योग्य संधी उपलब्ध करून देणे, हे या सहकार्याचे महत्त्वाचे पैलू आहेत.

'Think – Build – Scale 10X' या संकल्पनेतून मोठी उद्दिष्टे साध्य करण्यासाठी दूरदृष्टीपूर्ण विचार, मजबूत पाया आणि नियोजनबद्ध विस्तार यांचा समन्वय आवश्यक असल्याचा संदेश देण्यात आला. कल्पनांचे कृतीशील योजनांमध्ये रूपांतर करणे, सक्षम संघ तयार करणे आणि उत्कृष्टतेसाठी सातत्याने प्रयत्न करणे हे संस्थात्मक व व्यावसायिक विकासाचे महत्त्वाचे आधार असल्याचे या चर्चेतून अधोरेखित झाले.

कार्यक्रमाचा समारोप आभारप्रदर्शनाने झाला. सिमकॉन मॅनेजमेंट फाउंडेशनच्या या उपक्रमातून व्यवस्थापन शिक्षण आणि उद्योग क्षेत्रातील मान्यवरांना एकत्र आणत संस्थात्मक विकास, व्यवसायवृद्धी आणि नेतृत्वनिर्मिती यांसारख्या विषयांवर विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी महत्त्वपूर्ण व्यासपीठ उपलब्ध झाले. या कार्यक्रमाला सिमकॉन मॅनेजमेंट फाउंडेशनचे अध्यक्ष श्रीकांत संपत, उपाध्यक्ष सौरव मोहता, सचिव अमित बाजपेयी, कोषाध्यक्ष मोहन अग्रवाल तसेच कार्यकारिणी सदस्य प्रशांत गोडबोले आणि रंजीत दाणी यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

थोडक्यात

'किल्ले बनवा, इतिहास जागवा' कार्यशाळा उत्साहात संपन्न

विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, शिवकालीन गड-किल्ल्यांच्या इतिहासाचा जागर



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

खासदार सांस्कृतिक महोत्सव समिती, नागपूर यांच्या वतीने आयोजित खासदार शिव किल्ले स्पर्धा अंतर्गत किल्ले बनवा, इतिहास जागवा या विषयावरील कार्यशाळा शनिवार, दिनांक २४ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ३ वाजता भानुताई गडकरी स्मृती सभागृह, सेवासदन शाळा, सीताबर्डी, नागपूर येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. या कार्यशाळेला विद्यार्थी, पालक, इतिहासप्रेमी आणि मान्यवरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्यशाली इतिहासाची, गड-किल्ल्यांच्या स्थापत्यवैभवाची आणि स्वराज्याच्या प्रेरणादायी परंपरेची विद्यार्थ्यांना ओळख व्हावी, तसेच नव्या पिढीमध्ये इतिहासाविषयी जिज्ञासा, अभिमान आणि संवर्धनाची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेला खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे कोषाध्यक्ष राजेशजी बागडी, उपाध्यक्ष डॉ. दीपकजी खिरवडकर, स्पर्धेचे सहसंयोजक संजयजी बंगाले, इतिहास अभ्यासक आनंद मांजरखेडे, ब्रिगेडियर गावपांडे सर, तसेच दुर्ग प्रतिष्ठान, नागपूरचे संस्थापक अतुल गुरु आणि त्यांची टीम उपस्थित होती.

कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांनी माती, दगड आणि उपलब्ध साहित्याच्या साहाय्याने शिवकालीन गड-किल्ल्यांच्या प्रतिकृती तयार करण्यामध्ये उत्साहाने सहभाग घेतला. किल्ल्यांची रचना, बुरुज, तटबंदी, प्रवेशद्वारे आणि संरक्षणव्यवस्था यांची माहिती घेत विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष कृतीतून इतिहास समजून घेण्याचा प्रयत्न केला. दुर्ग प्रतिष्ठान, नागपूरच्या टीमने या उपक्रमात सहभाग नोंदवत गड-किल्ल्यांचा जतन-संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शीतल वैद्य यांनी केले. त्यांनी कार्यशाळेची संकल्पना, आयोजनामागील उद्देश आणि विद्यार्थ्यांमध्ये शिवकालीन इतिहासाविषयी आवड निर्माण करण्याचे महत्त्व विशद केले. संजयजी बंगाले यांनी उपस्थित सर्व मान्यवर, आयोजक, मार्गदर्शक, दुर्ग प्रतिष्ठानची टीम, विद्यार्थी, पालक आणि कार्यशाळेला सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

पथनाट्याच्या माध्यमातून कचरा व्यवस्थापनाची माहिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडून उपक्रमाचे आयोजन



दै. सिंहवाणी वृत्त,पुणे

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तथवडे येथे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि बेसिक्स मुन्सिपल वेस्ट वेंचर्स मार्फत पथनाट्य सादरीकरण करण्यात आले. यात जागतिक प्रदूषणावर लक्षवेधक कचऱ्याचे व्यवस्थापन कसे करावे हे पथनाट्याच्या आधारे विद्यार्थ्यांना पटवून दिले. पथनाट्य सादरीकरणात आशिष कोतवाल, अतुल वाघमारे, शिवप्रसाद पासलकर, माणिक खाटिंग, अनिकेत शिंदे, किशोर वाघमारे, नयन अमराळे, अनिकेत शिंदे, शिवप्रसाद पासलकर, साहिल शिंदे आणि आकाश खंडारे आदींनी सहभाग घेतला होता. मुळशी तालुक्यातील मारूंजी केंद्रातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तथवडे येथे पिंपरी चिंचवड महापालिका आणि बेसिक्स म्युनिसिपल वेस्ट वेंचर्स यांच्या संयुक्त विद्यमाने कचरा व्यवस्थापन जनजागृती करण्यासाठी पथनाट्याचे आयोजन करण्यात आले होते. कचऱ्याचे प्रकार किती व कोणते? प्रदूषण कोणकोणत्या गोष्टींमुळे होते? ते कसे टाळले पाहिजे. कचऱ्याचे व्यवस्थापन कसे करावे? याबाबत युवकांनी पथनाट्याच्या माध्यमातून माहिती दिली. यावेळी मुख्याध्यापक संगिता सूर्यवंशी, कविता मोहिते, भारती जाधव, जयश्री दांगडे, सारिका भालेकर, शिवप्रसाद गुट्टे, प्रिती चव्हाण, प्रियांका झनकर आणि साहित्यिक शिक्षक सचिन बेंडभर उपस्थित होते. मारुंजी केंद्राचे केंद्रप्रमुख सुरेश साबळे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले आहे. गटशिक्षणाधिकारी संग्राम पाटील आणि गटविकास अधिकारी सुधीर भागवत यांनी शिक्षकांचे अभिनंदन करत शाळेला शुभेच्छा दिल्या आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साहित्यिक शिक्षक सचिन बेंडभर यांनी केले. तर मुख्याध्यापक संगिता सूर्यवंशी यांनी आभार मानले.

विदर्भ दुष्काळमुक्त करण्यासाठी पक्षाभिनिवेश बाजूला ठेवून सर्वांनी एकत्र या : नितीन गडकरी

अॅग्रोव्हिजनच्या माध्यमातून एका व्यासपीठावर येण्याचे आवाहन, १७व्या अॅग्रोव्हिजनमध्ये दुष्काळी परिस्थितीतील जलव्यवस्थापन, पाणी नियोजन आणि पीक पद्धतींवर होणार सखोल मंथन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

विदर्भातील शेतकऱ्यांचे मनोबल उंचावत दुष्काळावर मात करण्यासाठी जलसंवर्धन, पाण्याचे काटेकोर नियोजन आणि योग्य पीक पद्धतींचे मार्गदर्शन देण्याचा अॅग्रोव्हिजनचा प्रयत्न आहे. उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर, दुष्काळात उपयुक्त पीक पद्धती आणि शेतीचे नियोजन यावर १७व्या अॅग्रोव्हिजनमध्ये विशेष भर दिला जाणार आहे. आजच्या संकटाकडे संधी म्हणून पाहून भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सज्ज होणे आवश्यक आहे. विदर्भ दुष्काळमुक्त करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्वांनी पक्षाभिनिवेश बाजूला ठेवून एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. आव्हान मोठे असले, तरी त्यावर मात करणे अशक्य नाही, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री मंत्री तसेच अॅग्रोव्हिजनचे मुख्य प्रवर्तक नितीन गडकरी यांनी केले.

नागपूर येथे २७ ते ३० नोव्हेंबरदरम्यान होणाऱ्या मध्य भारतातील भव्य कृषी प्रदर्शनाच्या पूर्वतयारीसाठी आयोजित आयोजन समितीच्या बैठकीत ते बोलत होते. बैठकीला विदर्भातील बहुतांश आमदार, कृषी राज्यमंत्री अॅड. आशिष जयस्वाल, गृहराज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, अॅग्रोव्हिजनचे अध्यक्ष रवी बोरकर आणि सचिव डॉ. सी. डी. मायी यांच्यासह विविध



क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

विदर्भातील दुष्काळाच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाय शोधण्यासाठी लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या सर्व घटकांनी एकत्र येऊन काम करण्याची आवश्यकता गडकरी यांनी अधोरेखित केली. ते म्हणाले, विदर्भ दुष्काळमुक्त कसा होईल, यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करायचे आहेत. ग्रामीण भागात काम करणाऱ्या तालुका व जिल्हास्तरीय कार्यकर्त्यांसह आमदार आणि खासदारांनी पक्षाभिनिवेश बाजूला ठेवून या प्रश्नावर एकत्रितपणे काम केले पाहिजे. आव्हान मोठे असले, तरी त्यावर मात करणे कठीण नाही. त्यासाठी सामूहिक प्रयत्न, योग्य नियोजन आणि उपलब्ध संसाधनांचा प्रभावी वापर आवश्यक आहे. शासनाच्या विविध योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे, शेतकरी आणि शेती समृद्ध करणे तसेच सर्वसामान्य माणसाच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणणे, हे आपले सामूहिक उद्दिष्ट असले पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शेतकरी, शेती आणि सर्वसामान्य माणूस समृद्ध व्हावा, यासाठी अॅग्रोव्हिजनच्या माध्यमातून आपण सर्वांनी एका व्यासपीठावर यावे, असे आवाहन गडकरी यांनी केले. जलसंवर्धन, पाणी नियोजन, आधुनिक कृषी तंत्रज्ञान आणि शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी या माध्यमांतून विदर्भाच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देता येईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

दुष्काळी परिस्थितीत जलसंवर्धन आणि पाणी नियोजनाला प्राधान्य हवामानबदल आणि पावसाच्या अनिश्चिततेमुळे शेतीसमोरील आव्हाने वाढली आहेत. त्यामुळे जलसंवर्धन, उपलब्ध जलस्रोतांचे योग्य व्यवस्थापन, पाण्याचा काटकसरीने वापर आणि पिकांची योग्य निवड यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

नितीन गडकरी म्हणाले, जलसंवर्धन आणि जलसंधारण ही काळाची गरज आहे. आजच्या संकटाकडे संधी म्हणून पाहून भविष्यातील शेतीचे प्रभावी नियोजन करणे आवश्यक आहे. लोकप्रतिनिधी आणि तालुका पातळीवरील कार्यकर्त्यांनी या कामात सक्रिय सहभाग घ्यावा. शेतकऱ्यांपर्यंत अचूक माहिती व मार्गदर्शन पोहोचवून त्यांना संकटाचा सामना करण्यास सक्षम करणे गरजेचे आहे.

अॅग्रोव्हिजनच्या माध्यमातून बदलत्या कृषी परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी शेतकऱ्यांना आवश्यक ज्ञान, तंत्रज्ञान आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन दिले जाणार आहे. कमी पाण्यात शेती, पाणी नियोजन आणि दुष्काळात उपयुक्त पीक पद्धती यांवर प्रदर्शनादरम्यानच्या कार्यशाळांमध्ये चर्चा होईल.

शेतकऱ्यांच्या पाठीशी राज्य सरकार ठाम : अॅड. आशिष जयस्वाल

कृषी राज्यमंत्री अॅड. आशिष जयस्वाल यांनी दुष्काळी परिस्थितीत कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना आणि शेतकऱ्यांसाठीच्या उपाययोजनांची माहिती दिली. उपलब्ध साधनसंपत्तीचा विचार करून शेतकऱ्यांनी योग्य नियोजन करावे. संकटाच्या काळात आवश्यक मदत व मार्गदर्शन देण्यासाठी सरकार त्यांच्या पाठीशी आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली. शासकीय योजनांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे, आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची ओळख करून देणे आणि पीक नियोजनाबाबत मार्गदर्शन करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

१६ वर्षांच्या कार्याचा आढावा; पुढील नियोजनाची माहिती

बैठकीच्या प्रारंभी अॅग्रोव्हिजनचे अध्यक्ष रवी बोरकर यांनी प्रास्ताविक केले. अॅग्रोव्हिजनची भूमिका, गेल्या १६ वर्षांतील उपक्रम, कृषी क्षेत्रातील योगदान आणि आगामी प्रदर्शनाचे नियोजन यांची त्यांनी माहिती दिली. शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन, प्रयोगशील शेती आणि कृषी क्षेत्रातील नव्या संधींची माहिती देणे हा अॅग्रोव्हिजनचा प्रमुख उद्देश आहे. शेतकरी, कृषी तज्ज्ञ, संशोधक, कृषी विद्यापीठे आणि संबंधित संस्थांना एकत्र आणणारे व्यासपीठ म्हणून अॅग्रोव्हिजनने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. यंदाही प्रत्यक्ष शेतीत उपयुक्त ठरणारे तंत्रज्ञान आणि आधुनिक पद्धती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर दिला जाणार आहे.

शेतकऱ्यांसाठी विशेष कार्यशाळा; जिल्हानिहाय गटांची निर्मिती

अॅग्रोव्हिजनचे सचिव डॉ. सी. डी. मायी यांनी यंदाच्या प्रदर्शनातील प्रमुख कृषी कार्यशाळांची माहिती दिली. विविध पिके, आधुनिक तंत्रज्ञान आणि शेतीतील नव्या संधींविषयी तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने कार्यशाळांचे नियोजन करण्यात आले आहे. प्रत्येक कार्यशाळेसाठी विदर्भातील जिल्हानिहाय शेतकरी गट तयार करण्यात आले आहेत. विशिष्ट पिके किंवा कृषी विषयांत रुची असलेल्या शेतकऱ्यांनी अॅग्रोव्हिजनकडे नावे नोंदवावीत, असे आवाहन डॉ. मायी यांनी केले. या गटांद्वारे शेतकऱ्यांना संबंधित कार्यशाळांशी जोडता येईल आणि आपल्या शेतीशी संबंधित प्रश्नांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेता येईल.

शेतकऱ्यांना ज्ञान, तंत्रज्ञान आणि नियोजनाचे व्यासपीठ

२७ ते ३० नोव्हेंबरदरम्यान नागपूर येथे होणाऱ्या १७व्या अॅग्रोव्हिजनमध्ये कृषी क्षेत्रातील विविध विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन, विशेष कार्यशाळा आणि आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती उपलब्ध करून दिली जाणार आहे. दुष्काळी शेती व्यवस्थापन, जलसंवर्धन, पाणी नियोजन आणि योग्य पीक पद्धतींना यंदा विशेष महत्त्व दिले जाणार आहे.

बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना अधिक सजग, नियोजनबद्ध आणि तंत्रज्ञानाभिमुख करण्याच्या दृष्टीने हे प्रदर्शन महत्त्वाचे ठरणार आहे.

या बैठकीला खासदार मायाताई इवनाते, आमदार डॉ. प्रवीण पोटे, आ. प्रताप अडसड, आ. किशोर जोरगेवार, आ. चरणसिंग ठाकूर, आ. उमेश यावलकर, आ. केवलराम काळे, आ. प्रवीण तायडे, आ. डॉ. मिलिंद नरोटे, आ. कृष्णा खोपडे, दादाराव केचे, माजी खासदार सुनील मेंढे, आनंदराव राऊत, मनोहर कुंभारे, सुधीर दिवे, विजय जाधव, संध्याताई गोतमारे, रमेश मानकर, मोरेश्वर वानखेडे, कॅप्टन कलंत्री यांच्यासह विदर्भातील सर्वच जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बिंझली जिल्हा परिषद शाळेत शिक्षक-पालक सभा उत्साहात संपन्न

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांनी दररोज दोन तास अभ्यासासाठी द्यावेत, सभेत मार्गदर्शन

दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा

जिल्हा परिषद हिंदी वरिष्ठ प्राथमिक शाळा, बिंझली येथे बुधवार, दि. २१ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ३ वाजता शिक्षक-पालक सभेचे आयोजन करण्यात आले. विशेषतः इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी ही सभा आयोजित करण्यात आली होती. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष यादनलालजी लिल्हारे व उपसरपंच विक्रांत मिश्रा यांनी मागील शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठकीत दर महिन्याला अशा सभांचे आयोजन करण्याबाबत सूचना दिल्या होत्या.

या सभेत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसह त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये



चांगल्या शिक्षणाची आवड निर्माण करणे, चांगल्या सवयी लावणे, वाईट सवयींपासून दूर ठेवणे, शारीरिक व परिसर स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणे आणि शिष्टाचाराची जाणीव निर्माण करणे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी आपली पुस्तके, वह्या व पेन व्यवस्थित ठेवून शालेय दप्तराची योग्य निगा राखावी, शिक्षकांनी दिलेला गृहपाठ नियमितपणे पूर्ण करावा तसेच घरी दररोज किमान दोन तास अभ्यासासाठी बसून दिवसभर शिकविलेल्या विषयांची उजळणी करावी, असे आवाहन करण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिकविलेल्या विषयांचे आकलन वाढण्यास मदत होईल आणि ते दुसऱ्या दिवशी शाळेत पूर्ण तयारीनिशी येऊ शकतील, असेही सांगण्यात आले.

शाळेला आपले घर व कुटुंब समजून तिची स्वच्छता राखावी, शाळेच्या परिसरात स्वच्छता ठेवावी आणि शाळेतच भोजन करावे, याबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे आवाहन पालकांना करण्यात आले. तसेच खान अकॅडमीच्या मोबाईल अॅपचा उपयोग शैक्षणिक माहितीसाठी करावा, मोबाईलवरील खेळांमध्ये वेळ वाया घालवू नये आणि मोबाईलचा वापर मर्यादित ठेवून नवीन ज्ञान मिळविण्यासाठी त्याचा सदुपयोग करावा, यावर विशेष भर देण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी युवराजजी उपराडे होते, तर शाळेचे मुख्याध्यापक सी. एम. पांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डी. के. तिवारी, कु. साक्षी मच्छिरके व एल. आर. उपराडे यांनी मार्गदर्शन केले. सभेला पालक मंजू लिल्हारे, राजकुवर सुलाखे, भुवनेश्वरी सुलाखे, सरिता सुलाखे, सविता लिल्हारे, अनीता नागपुरे यांच्यासह इतर पालक उपस्थित होते. सर्व पालकांनी सभेला उत्स्फूर्त व सकारात्मक प्रतिसाद दिला.

सभेच्या शेवटी सर्व पालकांनी आपल्या पाल्यांना घरी दररोज दोन तास अभ्यासासाठी बसविण्याचा तसेच शाळेच्या नियमांचे पालन करण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्याचा संकल्प केला. पालकांच्या सकारात्मक सहभागामुळे ही शिक्षक-पालक सभा यशस्वीरीत्या संपन्न झाली.

पंचपरिवर्तनातून समाज संघटन आणि विश्वगुरू भारताचा संकल्प : बालकृष्णजी बिसेन

सालेकसात राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे विजयादशमी तसेच शस्त्रपूजन उत्साहात



दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा

"विजयादशमीचा सण असत्यावर सत्याचा, अधर्मावर धर्माचा आणि अन्यायावर न्यायाचा विजयाचे प्रतीक आहे. भगवान श्रीराम यांचा विजय आणि माता दुर्गा यांच्या शौर्याची आठवण करून देणारा हा सण आपल्याला साहस, शक्ती, अनुशासन आणि धर्माचे रक्षण करण्याची प्रेरणा देतो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या परंपरेत विजयादशमी उत्सवाला विशेष महत्त्व आहे. याच पवित्र दिवशी सन १९२५ मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना झाली होती. हा उत्सव आपल्याला राष्ट्रभक्ती, संघटन, सेवा, समर्पण आणि समाजाप्रती असलेल्या आपल्या कर्तव्यांची जाणीव करून देतो," असे प्रतिपादन गोंदिया जिल्हा सहकार्यवाह बालकृष्णजी बिसेन यांनी केले. ते पुढे म्हणाले, "शस्त्रपूजनाचा अर्थ केवळ शस्त्रांची पूजा करणे असा नाही, तर शक्ती, साहस आणि आत्मरक्षणाचा संकल्प जागृत करणे हा सुद्धा आहे. शक्तीचा वापर सदैव धर्म, समाज आणि राष्ट्राच्या रक्षणासाठीच झाला पाहिजे, हाच या पर्वाचा संदेश आहे. राष्ट्रभक्ती, संस्कार, सामाजिक एकात्मता आणि सेवाभावाची भावना समाजात जागृत करण्याचे कार्य राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सातत्याने करीत आहे. कुटुंब प्रबोधन, पर्यावरण संरक्षण, सामाजिक समरसता, नागरिक कर्तव्य आणि स्वबोध हे पंचपरिवर्तन समाजाने स्वीकारले, तर निश्चितच हा देश विश्वगुरू होणार."

सालेकसा येथील तहसील परिसर मैदानावर २३ ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शाखेच्या वतीने आयोजित विजयादशमी तथा शस्त्रपूजन उत्सवात प्रमुख वक्ते म्हणून बालकृष्णजी बिसेन बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त नायब सुभेदार युवराजजी कृपाले उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख अतिथींचा हस्ते शस्त्रपूजन करण्यात आले. त्यानंतर सांघिक गीत, अमृतवचन आणि वैयक्तिक गीत सादर करण्यात आले. यानंतर प्रमुख अतिथींचा परिचय, प्रास्ताविक, अतिथी उद्बोधन आणि प्रमुख वक्त्यांचे मार्गदर्शन झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय व आभार प्रदर्शन खंड कार्यवाह सुखलाल मच्छिरके यांनी केले. या प्रसंगी सालेकसा मंडळाचीन स्वयंसेवकांचा मोठ्या उपस्थितीत विजयादशमी तथा शस्त्रपूजन उत्सव अत्यंत उत्साहात पार पडला.

जिल्हा परिषदेकडून ग्रामीण आरोग्य सेवेत गुणवत्तापूर्ण परिवर्तन, ८२ आरोग्य संस्थांना NQAS मानांकन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

ग्रामीण भागातील नागरिकांना सुरक्षित, दर्जेदार आणि रुग्णकेंद्रित आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या दिशेने नागपूर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने महत्त्वपूर्ण प्रगती साधली आहे. जिल्ह्यातील एकूण ८२ आरोग्य संस्थांनी राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन प्राप्त केले आहे. यामध्ये ७४ आरोग्य उपकेंद्रे, ७ प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि १ शहरी प्राथमिक आरोग्य केंद्राचा समावेश आहे.

केवळ मानांकन नव्हे, तर गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवेची बांधिलकी!

NQAS मानांकन हे आरोग्य संस्थांमधील सेवा गुणवत्ता, मानकांचे पालन, नियमित स्वच्छता, संसर्ग प्रतिबंध, रुग्णांची सुरक्षितता, औषधोपचारांची उपलब्धता, निर्धारित कार्यपद्धतींचे पालन आणि रुग्णांच्या हक्कांचे संरक्षण यांसारख्या महत्त्वपूर्ण बाबींचे मूल्यांकन करणारी प्रक्रिया आहे. या उपक्रमामुळे आरोग्य संस्थांमध्ये गुणवत्ता मूल्यमापन, कामकाजातील शिस्त आणि सेवांमध्ये सातत्यपूर्ण सुधारणा करण्यास चालना मिळते.

सुशासन, नियोजन आणि सांघिक प्रयत्नांचे फलित

या प्रगतीमागे नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीनिवास महामुनी यांचे मार्गदर्शन, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राजकुमार गहलोत, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. रेवती साबळे, सर्व तालुका आरोग्य अधिकारी तसेच NQAS पथकाचे समन्वित प्रयत्न महत्त्वाचे आहेत. जिल्हा मुख्यालय स्तरावर डॉ.प्रशांत कापसे यांच्या नेतृत्वाखाली NQAS संबंधित कामकाजाचे समन्वयन, तांत्रिक मार्गदर्शन, गुणवत्ता मानकांची पूर्तता आणि पाठपुरावा करण्यात पथकाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.

नियोजनबद्ध अंमलबजावणी, नियमित आढावा, क्षेत्रीय स्तरावरील समन्वय आणि गुणवत्ता सुधारण्यावर सातत्यपूर्ण भर यांमुळे या उपक्रमाला गती मिळाली आहे. सुशासनाचे खरे मोजमाप केवळ योजनांची संख्या किंवा मानांकनांमध्ये नसून, त्यातून सामान्य नागरिकांना मिळणाऱ्या लाभात असते. ग्रामीण नागरिकांना आपल्या गावाजवळच सुरक्षित, विश्वासार्ह आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा मिळावी, हा या प्रयत्नांचा मुख्य उद्देश आहे.